बुधवार, ४ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ६२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 4 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-62 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5




## सह्याद्री पठारावर पुष्पोत्सव









सध्या पश्चिम सह्याद्री घाटावरील सातारा जिल्ह्याच्या घाट माथ्यावरील कास पठारावर फुलांचे विविध रंगांचे गालिचे महाराष्ट्रासह विविध राज्य विदेशातून येणाऱ्या पर्यटक आणि निसर्ग अभ्यासकांचे डोळे तृप्त करत आहेत. जागतिक दर्जा प्राप्त या पुष्पोत्सवात दुर्मिळ फुलांच्या, वनस्पतींच्या आणि अनेक फुलांच्या दिवसभरातील बदलत्या वातावरणाच्या परिणामकारक अशा निसर्ग घटना आणि त्यांच्या अद्‌भुत साक्षात्काराचे रंगमय स्वर्गीय दर्शन घडते. या वेळी दुर्मिळ अशा पुष्पकंदिल आणि ड्रॉसेरा वनस्पती फुलांचे दर्शनही घडते. सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेल्या, निसर्गात जडणंघडणं झालेल्या श्रीरंग शिंदे या व्यक्तिमत्त्वाने आपल्या मातृभाषेतील शिक्षणाबरोबरच वनस्पती निर्मिती, त्यांची शास्त्रीय नावांची सखोल माहिती देऊन पर्यटक आणि फुले वनस्पती अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले. वनविभागातील शिंदे यांनी सखोल माहिती देताना आपल्या सह्याद्रीचे भूतलावरील या निसर्ग बगीचाचे संरक्षण जतन करणे महत्त्वाचे असल्याचे आवर्जून सांगितले. पृथ्वीवरील या फुलांचे स्वर्गीय दर्शन मानवी डोळ्यांना तृप्त करते एवढे मात्र खरे! छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे, सातारा

# राजकीय हालचालींना वेग

## अजितदादांची नाराजी : शिंदे, फडणवीस दिल्लीत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नाराजीच्या चर्चा सुरु असतानाच मंगळवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीस ते गैरहजर राहिले. त्यामुळे अजित पवार यांच्या नाराजीच्या चर्चांना आणखी उधाण आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर अजित पवार यांच्या गैरहजेरीबद्दल प्रतिक्रिया दिली. अजित पवार यांची तब्येत बरी नसल्यामुळे ते बैठकीला येऊ शकले नाहीत, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. पण राजकीय वर्तुळात एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यात नाराजी असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे. याच सगळ्या घडामोडींदरम्यान आणखी एक मोठी घटना घडली आहे, ती म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अचानक दिल्लीला रवाना झाले आहेत.**



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही नेते वरिष्ठांच्या भेटीसाठी दिल्लीला रवाना झाले आहेत. राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे या भेटीला जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे अजित पवार हे मंत्रिमंडळ बैठकीला हजर राहिले नाहीत. तसेच ते दिल्लीला देखील वरिष्ठांच्या भेटीसाठी गेलेले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्यामागे काय घडत आहे? याबाबतचा सस्पेन्स वाढला आहे. सत्ताधारी पक्षांमध्ये सध्या सारे काही आलबेल नाही, अशी चर्चा रंगताना दिसत आहे. अजित पवार यांच्याकडून बैठकांचा धडाका सुरु असल्यामुळे पुण्यातील भाजप नेत्यांमध्ये अस्वस्थता वाढली होती. पुण्याच पालकमंत्रीपद भाजपकडे आहे. भाजप नेते चंद्रकांत पाटील हे पुण्याचे पालकमंत्री आहेत. पण अजित पवार हे पुण्याच्या पालकमंत्रीपदासाठी आग्रही आहेत. याशिवाय इतर जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदावरुनही सत्ताधारी पक्षांमध्ये धुसफूस असल्याची चर्चा आहे. अनेक आमदार नाराज आहेत. त्यामुळे शिंदे-फडणवीस दिल्लीतील वरिष्ठांकडे आपापल्या आमदारांची भूमिका मांडण्याची शक्यता आहे. अजित पवार सत्तेत सहभागी झाले तेव्हाच शिंदे गटात धुसफूस सुरु झाली होती. अजित पवार यांचा गट सत्तेत सहभागी झाल्याने मंत्रिमंडळ विस्तारात आणखी एक वाटेकरी निर्माण झाला. त्यामुळे अजित पवार यांच्या गटाच्या नेत्यांसाठी देखील मंत्रिपदे देण्यात आली. यावेळी शिंदे आणि भाजपकडील काही महत्त्वाची खाते अजित पवार यांच्या गटाला मिळाली. अजित पवार यांना स्वतःला अर्थ खाते मिळाले. याशिवाय त्यांच्या गटाला शिंदे गटाकडे असणारे कृषी खाते मिळाले. यावरुन बरीच चर्चा सुरु होती. विशेष म्हणजे त्यावेळी शिंदे गटाच्या नेत्यांनी जाहीरपणे अजित पवार यांच्या सत्तेत सहभागी होण्याच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली होती.


### हनीमून संपायच्या आतच

उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाराज असल्याची चर्चा सुरू असताना आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या कार्यकारी अध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी सूचक वक्तव्य केले आहे. ट्रिपल इंजिन सरकारमधील एका नाराज इंजिनने देवेंद्र फडणवीस यांना भेटले असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. त्यामुळे अजित पवार हे नाराज असल्याची चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका मेळाव्याला संबोधित करताना सुप्रिया सुळे यांनी सूचक वक्तव्य केले आहे. सुप्रिया सुळे यांनी म्हटले की, मागील तीन महिन्यापूर्वी राज्यात ट्रिपल इंजिनचे सरकार स्थापन झाले होते. त्यानंतर आता या तीन महिन्यात सरकारमध्ये नाराजी सुरू झाली आहे. ट्रिपल इंजिनमधील एक नाराज घटक देवेंद्र फडणवीसांना भेटले असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. हे सरकार नेमके कोण चालवत आहे, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## श्री गणेशाला दुर्वा प्रिय का ?

आधुनिक केसरी

कुबेराने आपल्या परीने प्रयत्न करून पाहिला. त्याच्या भांडारातील सर्व सोने एका पारड्यात टाकले तरी दुर्वांचे पारडे जडच होते. त्याने मग सर्व देवांना पाचारण केले. इंद्र, कुबेर, विष्णू, शंकर आदी सर्व देव पारड्यात बसले तरी दुर्वांचे पारडे जडच होते. यामागे नक्कीच काहीतरी अर्थ असणार ही जाणीव इंद्राला आणि श्री विष्णूला झाली. आणि ते आश्रयासह कौंडीण्य ऋषींच्या आश्रमात आले. त्यावेळी ऋषींनी त्यांना दुर्वांची महती कथन केली आणि सांगितले की गणेश हा त्रैलोक्याचा स्वामी असून त्याच्याहून किंवा त्याने धारण केलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा काहीही श्रेष्ठ नाही.    श्री गणेशाशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी या प्रतिकात्मक आहेत. त्या प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी संदेश आहे. अनलासुर हा राग, लोभ आदि षड्रिपूंचे प्रतिक आहे. त्याचा नाश गणपतीने केला. त्यांचा नाश करण्यासाठी किंवा देवतेला प्रसन्न करण्यासाठी तपश्चर्या करावी लागते. तपश्चर्या करताना अंगात उष्णता निर्माण होते. ती उष्णता कमी करण्यासाठी दुर्वांचा उपयोग होतो. दुर्वा या एकवीस का वाहाव्यात किंवा एकवीस या संख्येचे काय महत्व आहे ? तर पृथ्वीवर सात खंड आहेत. सात समुद्र आहेत. सात वार आहेत. शरीरातही सप्त धातू आहेत. विवाहातही सप्तपदी आहे. आणि सत्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत. या साताला तीनने गुणले की उत्तर एकवीस येते. श्री गणेश हा सत्व, रज आणि तम या त्रिगुणांच्या पलीकडे असलेले दैवत आहेत. कालही तीन आहेत. वर्तमान, भूत आणि भविष्य. श्री गणेश हा आदिदेव. तो या सगळ्यांच्या पलीकडे. पृथ्वी, आकाश आणि पाताळ हे ही तीन लोक तो व्यापून उरला आहे. मानवी शरीराच्या तीन अवस्था आहेत. जन्म, जरा आणि मृत्यू. अशा या सगळ्या प्रतीकात्मक गोष्टी.  दुर्वा या श्रीमंतापासून गरीबांपर्यंत सर्वांना सहज उपलब्ध होतील अशा आहेत. अलीकडे चांदीच्या दुर्वा पण श्री गणेशाला वाहिल्या जातात. पण खऱ्याखुऱ्या दुर्वाच श्री गणेशाला जास्त प्रिय आहेत. दुर्वा म्हणजे दिसायला गवत किंवा हरळी. पण त्यांचे महात्म्य मोठे. तेव्हा या गणेशोत्सवात गणपतीला प्रिय असणारे मोदक तर वाहू या, प्रसाद म्हणून भक्षण करू या पण दररोज कमीत कमी एकवीस दुर्वांची एक जुडी आणि प्रिय असणारे जास्वंदीचे फुल तरी श्री गजाननाला भक्तिभावे अर्पण करू या.





## आनंदी पहाट

## जागतिकीकरणाच्या नवकल्पना अर्थाशी निगडित

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणावर आधारित आर्थिक धोरण राबविण्याचे ठरले. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या या युगात, भारताने अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांमध्ये वेगवान वाढ पाहिली आहे, जरी भारताने नवीन आर्थिक धोरणाचा अवलंब करण्यास सुरुवात केली, तेव्हा चांगले परिणाम अपेक्षित होते. अर्थशास्त्राचा अभ्यास का महत्त्वाचा आहे, हे समजून घेण्यासाठी प्रथम अर्थशास्त्र म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. कॉलिन्स इंग्लिश डिक्शनरीमध्ये अर्थशास्त्राची व्याख्या अशी आहेः समाजात पैसा, उद्योग आणि व्यापार कशा प्रकारे आयोजित केला जातो याचा अभ्यास करणे होय. सामाजिक विज्ञान मानले जाते, समाजात दुर्मिळ साधनांची देवाणघेवाण कशी होते हे समजून घेण्यासाठी अर्थशास्त्र वैज्ञानिक पद्धती वापरते. अर्थशास्त्रज्ञ सरकारमधील धोरणे विकसित करण्यासाठी उपयुक्त सिद्धांत आणि तंत्रांचा अभ्यास करतात कारण त्यांना आजच्या जगात कार्यक्षमता कशी निर्माण करायची याचे सखोल ज्ञान आहे. तर, अर्थशास्त्र महत्त्वाचे का आहे ? कारण आणि परिणाम ह्यामधील संबंधांची ही चौकशी आर्थिक वाढीला प्रभावित करण्यासाठी महत्त्वाची आहे. संसाधनांचे वाटप कसे करावे याबद्दल सल्ला देताना अर्थशास्त्रज्ञ, नोकरी, बाजार आणि संपूर्ण समाजावरील जोखीम आणि फायदे पाहतात. आपलं धन ह्या शब्दांमधूनच आपल्या स्वतःच्या पैशाविषयीच्या भाव-भावना प्रकट होत असतात. आपल्याला आपल्या स्वतःच्या धनाविषयी असलेलं प्रेम आणि त्यामुळेच निर्माण झालेलं आपल्या पैशाबरोबरचं नातं अतूट असतं. प्रत्येकाच्या ज्याप्रमाणे गरजा वेगवेगळ्या असतात, त्याचप्रमाणे उत्पन्न अथवा आपल्या हाती येणारा पैसा देखील कमी-अधिक प्रमाणात आपल्या पदरी पडत असतो. खरं कसब आपल्या हाती असणाऱ्या पैशाचा योग्य वापर आणि बचत आपण कशाप्रकारे करतो त्यातच असतं.



आधुनिक केसरी

**ब्रह्मानंदी टाळ | निनादतो ||**
व्हावे सदा लीन | सत्कर्माचे ठायी ||
पुण्य फळ देई | निष्कामता ||१||
त्रिगुणाचे अंगी | विकाराची सत्ता ||
तीने सकामता | फोफावली ||२||
माया मोह सारे | दुःखाचे कारण ||
जीतेपणी मरण | भोग सारे ||३||
कर्माचे तू वर्म | जाण माझ्या मना ||
फिटेल रे दैना | जन्माची ह्या ||४||
ज्याचे दारी उभा | सोन्याचा पिंपळ ||
ब्रह्मानंदी टाळ | निनादतो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

खड्गहस्तां धनुर्हस्तां स्वर्णवर्णां हिरण्यदाम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
१०२|| हाती खड्ग, धनुष्य धारण करणाऱ्या स्वर्णिम कांती असलेल्या, हिरण्य म्हणजे सुवर्ण अर्थात संपदा देणाऱ्या दुर्गा देवीला तिन्ही तापांच्या शांतीसाठी मी नमस्कार करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

आदि गुरु है सृष्टि का, मधुमति आप प्रचार
। सन्त सन्त मत अमत है, महिमा अपरम्पार
।।६२।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/६२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
नित्य अनादि सद्गुरु सुकृतदेव ब्रह्मविद्येचे आदि गुरु आहेत. तेच सृष्टीच्या प्रारंभी ब्रह्मविद्येचा संदेश अध्यात्म-पथिकांना देतात. त्यांचे नाव सन्त असून त्यांच्या मताला सन्तमत म्हणतात. हे सन्तमत प्राकृतिक मार्गांपेक्षा भिन्न शुद्ध चेतन-पथ आहे, म्हणूनच सन्तमत अमत आहे. ब्रह्मविद्या विहंगम योग मार्गाला सन्तमत म्हणतात. याची साधना प्रकृतीपार शुद्ध आत्म्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर सुरू होते. अर्ध आणि ऊर्ध्वाचा भेद जाणल्यानंतर सुष्मनातीत योगी या अनुभव चेतन मार्गाद्वारे अमर लोकाकडे गमन करतो. म्हणूनच ब्रह्मविद्येचे आदि आचार्य नित्य अनादि सद्गुरूंची महिमा अपार आहे.

..........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

दासबोध हा गरूशिष्य संवाद आहे. समर्थांच्या अफाट ज्ञानाच्या कक्षा प्रत्येक ओळीतुन प्रगट होताना दिसतात. सुरवातीला ते प्रापंचिक लोकांच्या मतांचे वर्णन करतात. खरं तर प्रपंच मी चालवतो त्यामुळे सगळं ज्ञान फक्त मोलाचं आहे अशा भ्रमात प्रापंचिक माणुस असतो. त्यामुळे कलह भांडणं. होण्याचीच जास्त शक्यता असते. त्याचे सविस्तर वर्णन आता करूया. एक म्हणतो की आपण संसार करावा, त्यावर देवाचं नियंत्रण असल्याने हा मी पणा खरा नाही. संसार करताना हव्यास निर्माण होतो. मग् मी पणा निर्माण होतो. आपल्या कुटूंबाची सेवा करावी लागते. संसार सहजपणे व सुखाने करावा, सद्गती मिळण्यासाठी दानधर्म करावा.

## परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे

आधुनिक केसरी

आईकरिता रडत असलेले मूल आई भेटल्याशिवाय रडणे थांबवत नाही, त्याप्रमाणे, समाधानाकरिता, आनंदाकरिता, धडपडणारा आपला जीव, परमेश्वर प्राप्त झाल्याशिवाय शांत राहू शकत नाही. म्हणून प्रपंचाची काळजी न करता, परमेश्वराची प्राप्ती कशी होईल याची काळजी करा. भगवंतावर संपूर्णपणे निष्ठा ठेवल्याशिवाय आपली प्रपंचाची काळजी दूर होणार नाही. सर्व जगताचा जो पालनकर्ता, तो आपले पालन नाही का करणार ? प्रत्येक गोष्ट त्याच्याच सत्तेने होते हे लक्षात ठेवा, मग प्रपंच कधीही बाधक होणार नाही. एक भगवंतावरची निष्ठा मात्र शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळा. आपण पुराणात वाचलेच आहे की, भीष्माने पांडवांना मारण्याची प्रतिज्ञा केली. भीष्मप्रतिज्ञाच ती, मग ती खोटी कशी होऊ शकेल ? सर्व पांडव चिंताग्रस्त झाले, पण द्रौपदीची निष्ठा मात्र जबरदस्त होती. ती म्हणाली, "आपण श्रीकृष्णाला विचारू." तिने सर्व वृत्तांत त्याला कथन केला. श्रीकृष्ण म्हणाला, "द्रौपदी,



तू आता असे कर, रात्री भीष्माचार्यांच्या आश्रमात जा. तिथे फक्त संन्याशांना आणि स्त्रियांना मुभा आहे. मी तुझ्याबरोबर आश्रमापर्यंत येतो." त्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीला घेऊन भीष्माचार्यांच्या आश्रमापर्यंत गेले आणि बाहेरच तिचे अलंकार आणि इतर वस्तू सांभाळत बसले. श्रीकृष्णांनी तिला आत जाताना सांगितले की, "भीष्माचार्य आता झोपत आहेत अशा वेळी तू आत जा आणि बांगडया वाजवून नमस्कार कर." त्याप्रमाणे द्रौपदी आत गेली, आणि बांगडया वाजवून नमस्कार केला." त्यांनी लगेच तिला "अखंड सौभाग्यवती भव" म्हणून आशीर्वाद दिला. मग त्यांनी पाहिले तो द्रौपदी. तेव्हा ते म्हणाले, "द्रौपदी, ही अक्कल तुझी खचित नव्हे; तुझ्याबरोबर कोण आहे ते सांग." ती म्हणाली, "माझ्याबरोबर गडी आणला आहे; तो बाहेर उभा आहे." भीष्माचार्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यांनी श्रीकृष्णाला ओळखले, परंतु आता सर्व काम होऊन चुकले होते. म्हणून म्हणतो, परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे. या निष्ठेच्या आड जर काही येत असेल तर तो म्हणजे आपला अभिमान. हा अभिमान सर्वांना घातक आहे. तो घालवण्यासाठीच परमात्म्याला वारंवार अवतार घेणे भाग पडले. ही अभिमानाची हरळी नाहीशी व्हायला भगवंताच्या नामासारखा दुसरा उपाय नाही. नामावर प्रल्हादाने जशी निष्ठा ठेवली तशी ठेवावी. त्याने नाम श्रद्धेने घेतले आणि निर्विषय होण्याकरिता घेतले, आपण ते विषयासाठी घेऊ नये. नामापरते दुसरे सत्य नाही हे समजावे. याच जन्मात हे नाम शांतीचा आणि समाधानाचा ठेवा मिळवून देईल.

## गहिनीनाथ



ते अरण्य महाभयंकर, वाट देखील धड उमगेना; अशा त्या घोर अरण्यांतून प्रवास करण्याचा प्रसंग आल्यामुळे मच्छिंद्रनाथ भिऊन गेला. त्याचे कारण असे होते कीं, स्त्रीराज्यातून निघतांना त्यास मैनाकिनी राणीने जी सोन्याची वीट दिली होती ती कोणास न समजू देता त्याने झोळीत ठेविली होती. ती वीट चोर नेतील या धास्तीने त्याच्या जिवात-जीव नव्हता. ही सर्व भीति गोरक्षनाथाच्या लोभाबद्दल परीक्षा पाहण्यासाठीच होती, नाही तर मच्छिंद्रनाथास भीति कशाची असणार ! तो मार्गात चालत असतां गोरक्षास विचारी की, ह्या घोर अरण्यात

आधुनिक केसरी


विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ४ ऑक्टोबर २०२३






रझाकारमध्ये हिंदू अत्याचाराचा थरार! पान ६


आनंदामृत ज्ञानेश्वरी! पान ७


# सियाम कार्यालयाचे कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रेल्वे स्टेशन येथील बजाज भवन येथे राज्याचे कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांच्या शुभहस्ते सीड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (सियाम)च्या नूतन कार्यालयाचे भव्य उदघाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सचिन कलंत्रे (महाव्यवस्थापक, महाबीज), विकास पाटील (कृषी संचालक-नि. व गु.) उपस्थित होते. त्यावेळेस अध्यक्ष, सचिव व कार्यकारी मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते. उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर सियाम च्या वतीने सुनील चव्हाण, सचिन कलंत्रे, विकास पाटील यांचा सियामच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. प्रथम समीर मुळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी बियाणे उद्योगासमोर असणाऱ्या समस्या व बियाणे उद्योगाचे आजचे प्रश्न, महाराष्ट्र शासन तयार करीत असलेले नवीन कायदे या बाबींचा आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये उल्लेख केला व कृषी आयुक्तांनी आमच्या बियाणे व्यवसायात येणाऱ्या अडचणीमध्ये लक्ष घालून त्या समस्याची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावे. अशी विनंती यावेळी केली. कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांच्या शुभहस्ते एशिया अँड पॅसिफिक सीड असोसिएशनचे अध्यक्ष मनीष पटेल यांचा सियामच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपस्थितांसमोर मनीष पटेल यांनी आपल्या भाषणामध्ये जागतिक परिस्थिती, भारतातील शेती, शेती व बियाणे उद्योगा समोरील प्रश्न, समस्याबाबत उपस्थितासमोर अभ्यासपूर्ण विवेचन केले. यानंतर झालेल्या चर्चा सत्रामध्ये उपस्थित बियाणे उत्पादकांनी कृषी आयुक्तासमोर बियाणे उत्पादकांना येणाऱ्या अडचणी व समस्या याबाबत माहिती दिली. त्याचे निवारण करण्याची विनंती केली. कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये सियाम करीत असलेल्या कार्याची प्रशंसा केली व त्याचबरोबर शेतकरी हिताचे कायदे करीत असताना प्रामाणिकपणे काम करणाऱ्या बियाणे उत्पादकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याबाबत शासन दक्षता घेईल, अशी ग्वाही दिली. तसेच बियाणे उत्पादकांनी मांडलेल्या समस्याबाबत संबंधितांना योग्य कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील आणि त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात येईल, असे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. शालिग्राम वानखडे यांनी केले.



**सीड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (सियाम) ची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न.**

सीड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (सियाम) ची 10 वी सर्वसाधारण सभा श्री. समीर मुळे, (अध्यक्ष, सियाम) यांचे अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन येथील बजाज भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी सन २०२३ – २४ च्या वार्षिक अर्थसंकल्पास मान्यता देण्यात आली.

सभेत श्री. सतीश कागलीवाल, श्री. रितेश मिश्रा, श्री. दिलीप देशमुख, श्री. मुकुंद करवा, श्री. सचिन भालिंगे, श्री. किशोर वीर, श्री. नाथा राऊत, श्री. अजित मुळे, श्री. वैभव काशीकर, प्रभाकर शिंदे, श्री. राघवेंद्र जोशी, श्री. समीर अग्रवाल व डॉ. शालिग्राम वानखेडे यांच्यासह बियाणे उत्पादक कंपन्यांचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. आर. व्ही. शेख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सभा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेला कोरम पूर्ण झाल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले. प्रथमता सभा सुरू करण्यापूर्वी नुकतेच निधन झालेले भारतातील हरितक्रांतीचे प्रणेते, थोर शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना उपस्थितांचे वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात करण्यात आली.

सुरुवातीला सियामच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजास सुरुवात होण्यापूर्वी सियामच्या वतीने नॅशनल असोसिएशन व स्टेट असोसिएशनचे उपस्थित सन्माननीय पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये श्री. राघवन संपत कुमार (कार्यकारी संचालक, फेडरेशन ऑफ सीड इंडस्ट्री ऑफ इंडिया नवी दिल्ली), डॉ. पी. पी. झवेरी (सचिव, गुजरात सीड इंडस्ट्री असोसिएशन), श्री अशोक कटेशिया (कार्यकारी संचालक, गुजरात सीड इंडस्ट्री असोसिएशन), श्री. मुरलीधर रेड्डी (अध्यक्ष सीडसमन असोसिएशन, हैदराबाद), श्री. सुभाष पारीख (डायरेक्टर टेक्निकल, सीड्स असोसिएशन ऑफ मध्य प्रदेश), श्री. दिपांकर, श्री. यशपाल सैनी (नॅशनल सीड असोसिएशन ऑफ इंडिया नवी दिल्ली) या सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मुकुंद करवा (सचिव, सियाम) यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून सभेपुढे सादर केला. श्री. सचिन भालिंगे (कोषाध्यक्ष, सियाम) यांनी सन २०२२ –२३ चा वार्षिक ताळेबंध व लेखापरीक्षण अहवाल सादर केला. त्यानंतर त्यांनी सन २०२३ – २४ चा वार्षिक अर्थसंकल्प सभेपुढे सादर केला. वरील दोन्ही बाबीस सर्वसाधारण सभेने एकमताने मान्यता दिली. सभेमध्ये सतीश कागलीवाल (माजी अध्यक्ष, सियाम) यांनी उपस्थितांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. त्यानंतर झालेल्या चर्चासत्रामध्ये सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन बियाणे उत्पादन आणि विक्री या विषयावर चर्चा केली व आपले प्रश्न सभेसमोर मांडले. समीर मुळे (अध्यक्ष सियाम) यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बियाणे व्यवसायातील अडचणी, या वर्षी निर्माण होणारी दुष्काळ सदृश्य परिस्थिती, महाराष्ट्र शासन नव्याने तयार करीत असलेले बियाणे विषयक कायदे, त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, याबाबत सभागृहास अवगत केले. यासाठी सर्व बियाणे उत्पादकांनी एकत्रित येऊन काम करण्याची गरज आहे. असे त्यांनी नमूद केले. बियाणे उद्योगाचे प्रश्न सोडविण्यासाठी 'सियाम' सर्वात पुढे राहील, याबाबत सर्व सदस्यांना आश्वासित केले. त्यासाठी सर्व सदस्यांनी सियामला सहकार्य करावे, असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे शेवटी मुकुंद करवा (सचिव, सियाम) यांनी उपस्थित सर्व कंपनी सदस्यांचे आभार मानले.

## १० हजारांची लाच घेताना जमादार जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** तालुक्यातील बिडकीन येथील एका खाजगी पतसंस्थेच्या मॅनेजरने पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्हयाचा तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करावे आणि पतसंस्थेचे पैसे परत मिळवून देण्यासाठी १० हजाराची लाच घेताना बिडकीन पोलीस ठाण्यातील जमादार सतीश प्रल्हादराव बोडले पाना रंगेहाथ अटक करण्यात आली. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आज (दि. ३) दुपारी केली. बिडकीन परिसरातील एका पतसंस्थेच्या मॅनेजरकडून चुकून इतर खातेदारांच्या नावावर पैसे गेल्याचा काही प्रकार पडला होता. सदरील व्यक्तीकडून पैसे वसूल करून देण्यासाठी मॅनेजरने बिडकीन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या गुन्ह्याचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यासाठी जमादार सतीश बोडले यांनी तक्रारदार मॅनेजर कडे यांच्याकडे १० हजारांची लाच मागितली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात जाऊन याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार मंगळवारी दुपारी पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, उपअधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल घस, अंमलदार भीमराज जीवडे, सुनील पाटील, विनोद आघाव, चांगदेव बागुल यांनी सापळा रचून बिडकिन पोलीस ठाण्याच्या आवारात जमादार बोडले यांना लाच घेताना रंगेहात ताब्यात घेतले आहे.

# यंदाही दिवाळीला मिळणार आनंदाचा शिधा

## रवा, साखर, तेलासह ‘या’ दोन नव्या जिन्नसांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात राज्य मंत्रिमंडळाची बैठक काही वेळापूर्वी पार पडली. या बैठकीत मंत्रिमंडळाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक पार पडल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली आणि मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती दिली. मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं की यंदाही दिवाळीत राज्यातल्या नागरिकांना १०० रुपयांमध्ये आनंदाचा शिधा दिला जाईल. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयाने राज्यातील नागरिकांना ही गोड बातमी दिली आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीला आनंदाचा शिधा मिळणार असून यामध्ये दोन नवीन जिन्नसांचा समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, दिवाळीनिमित्त राज्यातील शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. या शिध्यात आता मैदा आणि पोह्याचाही समावेश करण्यात आला आहे. पूर्वी आनंदाचा शिधा या संचात रवा, चनाडाळ, साखर आणि खाद्यतेल असे ४ जिन्नस होते. मात्र आता यामध्ये दोन जिन्नसांची भर पडली आहे. राज्यातील अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्हे त्याचबरोबर नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिका असलेल्या नागरिकांना, शेतकऱ्यांना अशा १ कोटी ६६ लाख ७१ हजार ४८० शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल.

आंनदाचा शिधा या संचात १ किलो साखर, १ लीटर खाद्यतेल तसेच प्रत्येकी अर्धा किलो रवा, चनाडाळ, मैदा आणि पोहे असा शिधा दिला जाईल. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत वितरित करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ५३० कोटी १९ लाख इतक्या खर्चासदेखील आजच्या कॅबिनेट बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

## भाजपच शिवसेना ठाकरे गट चालवतो : प्रकाश आंबेडकरांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** ‘भाजपच अकोला जिल्ह्यातील शिवसेना ठाकरे गट चालवतो. जिल्ह्यातील भाजप आमदारांच्या इशाऱ्यावर शिवसेना ठाकरे गटाचे कार्य सुरू असते,’ असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ‘लोकसत्ता’शी बोलताना केला. दरम्यान, या प्रकरणात वंचितसोबतच्या आघाडीचे वरून आदेश आल्यास त्यांना पूर्ण सहकार्य राहील, अशी भूमिका शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांनी घेतली. राज्यात वंचित बहुजन आघाडी व शिवसेना ठाकरे गटामध्ये आघाडी आहे. या राजकीय पक्षांमध्ये राज्यात मैत्री असली तरी जिल्ह्यात स्थानिक नेत्यांकडून मात्र एकमेकांवर कुरघोडी करण्याचे नेहमीच प्रयत्न केले जातात. याचा प्रत्यय अकोला जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत आला. जिल्ह्यातील ग्रामीण भाग हा वंचित आघाडीचा गड म्हणून ओळखला जातो. गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून जिल्हा परिषदेवर वंचितची सत्ता आहे. भाजपच्या भूमिकेमुळे वंचितची सत्ता अबाधित राहिली, तर शिवसेना ठाकरे गट विरोधी पक्षाच्या भूमिकेत आहेत.जि.प.च्या सर्वसाधारण सभेत शिवसेना ठाकरे गटाने राज्यातील वंचित सोबतची आघाडी विसरत प्रमुख विरोधी पक्ष म्हणून सत्ताधारी वंचितला अडचणीत आणले.

# वाढीव घरपट्टीच्या विरोधात लोणंदचे नागरिक आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** खंडाळा येथे वाढीव घरपट्टीच्या विरोधात आंदोलन करण्यात आ .येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा.रघुनाथ शेळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन नगरपंचायती समोर होत असताना ही दर वाढ मान्य नसून ही रद्द करण्यात यावी याबाबतचे निवेदन लोणंद नगरपंचायतीचे मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड यांना देण्यात आले. तत्पूर्वी या आंदोलना दरम्यान प्रा.रघुनाथ शेळके यांच्या सह व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मनोज बारटक्के, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव शेळके, सुवर्णगाथा प्रतिष्ठानचे डॉ. नितीन सावंत, विरोधी पक्षनेत्या दीपाली निलेश शेळके,उपनगराध्यक्ष रवींद्र क्षीरसागर यांनी मनोगते व्यक्त केली. तसेच आभारपर भाषण राहुल घाडगे यांनी केले. यावेळी शिरीष मेहता, म्हस्कु अण्णा शेळके, वसंत पेटकर, जयेश शहा, सर्फराज बागवान, माजी नगराध्यक्ष शिवाजीराव शेळके,नगरसेवक भरत शेळके,भरत बोडरे, सागर शेळके,नगरसेविका तृप्ती घाडगे, दीपाली संदीप शेळके, ज्योती डोनिकर, किशोर पवार,इम्रान बागवान,सुनील शहा, विशाल शेळके,नानासाहेब धायगुडे,बबनराव शेळके, संदीप शेळके,गिरीश रावळ,हर्षवर्धन शेळके, सुभाषराव घाडगे,हणमंतराव शेळके,व्यंकटराव हेब्बार, धनंजय घोडके,सुनील यादव,शामसुंदर डोईफोडे, इकबाल बागवान,बाळकृष्ण भाटिया,रमेश कर्णवर, विनय रावखंडे, देवदत्त राऊत, शरद भंडलकर,मोईन बागवान आदींसह लोणंदकर नागरिक व्यापारी बांधव, व्यवसायिक उपस्थित होते. ज्या सुविधाच उपलब्ध नाहीत, अशा सुविधांबाबत कर लावणे चुकीचं असल्याचं प्रा.रघुनाथ शेळके यांनी प्रत्येक कराची माहिती देत दाखवून दिले. शैक्षणिक कराबाबत त्यांनी बोलताना म्हटले की, लोणंद नगरपंचायतीने बालवाडी सुद्धा सुरू केलेली नाही. त्यांनी सुंदर अशी बालवाडी सुरू करावी.मोफत शिक्षण द्यावं. शिक्षणाच्या आम्हाला सुविधा द्याव्यात. मगच आमच्या कडून शिक्षणकर घेतला पाहिजे. वृक्ष लागवड करांवरून बोलताना म्हटले की, कुणाच्या घरापुढे वृक्ष लावलेले आहेत ? आहे त्या वृक्षांचे पालन करता आलेलं नाही. नगरपंचायतीने कुठंही वृक्ष लावलेला नाही.रोजगार हमी योजना हा शासनाने लावलेला कर असला तरी या लोणंदमध्ये हजारो तरुण बेरोजगार आहेत. रोजगार हमीचे नियोजन करा. बेरोजगार तरुणाच्या हाताला काम द्या. मगच हा कर आमच्याकडून घ्या. विशेष सफाई करावर बोलताना प्रा. रघुनाथ शेळके म्हणाले की, आपल्या घरापुढे हे कधी सफाई करायला आलेले आहेत? आपण विचारणा केली त्यांना, स्वच्छता होत नाही तर ते म्हणतात तुम्ही कचरा करताय म्हणून आम्ही स्वच्छता का करायची?कचरा होतो म्हणून स्वच्छता करायची असते.पाणी पट्टी कराबाबत बोलताना स्वच्छ आणि सुंदर पाणी दिलं पाहिजे, असेही त्यांनी म्हटले.प्रत्येक कराबाबत सविस्तर मांडणी करत असताना उपस्थितांनी सुध्दा दाद दिली.

# गलथान कारभाराचे बळी

आधुनिक केसरी

नांदेडच्या शासकीय रूग्णालयात पहिल्या दिवशी 24 तर काल 7 अशा ऐकून 31 रूग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यावर विरोधकांकडून टीका करण्यात येत आहे. नांदेडमधील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. राज्य सरकारच्या गलथान कारभारामुळे 31 निष्पाप लोकांचे अन् बालकांचे बळी गेले. सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे राज्यसरकारचं दुर्लक्ष आहे. समर्थन देणाऱ्या आमदारांची खातीरदारी करण्यात सरकार व्यस्त आहे. ठाण्यानंतर नांदेडमध्ये अशी घटना घडणे म्हणजे सरकार लोकांच्या प्रश्नांसंदर्भात आणि आरोग्यासंदर्भात गंभीर नाही. बालकांच्या मृत्यूबद्दल आम्हाला खेद आहे. मृतांच्या कुटुंबियांच्या दु:ख आम्ही सहभागी आहोत. ट्रिपल इंजिन सरकारकडून फक्त घोषणा केल्या जातात. त्यांनी अंमलबजावणी मात्र होत नाही, असे म्हणत माजी मंत्री आणि काँग्रेसचे नेते विश्वजित कदम यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. राष्ट्रवादीच्या आमदार सुमन पाटील आणि रोहित पाटील हे सध्या उपोषण करत आहेत. तासगाव आणि कवठेमंकाळ तालुक्यातील 17 गावांना हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. टेंभू योजनेत या गावांना समाविष्ट केले पाहिजे, या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू आहे. यावरही विश्वजित कदम यांनी प्रतिक्रिया दिली. सुमनवहिनी आणि रोहित पाटलांशी फोनवर चर्चा झाली आहे. या प्रश्नासाठी स्वर्गीय पतंगराव कदम आणि आर. आर. आबांनी मोठा संघर्ष केला आहे. पंचवीस तीस वर्षात टेम्भूचे पाणी सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला मिळालं. मात्र काही भाग अजूनही वंचित आहे. यासंदर्भात शासनाने तातडीने समिती गठीत करून योग्य निर्णय घ्यावा. सरकारने दुष्काळग्रस्त भागाला दिलासा द्यावा, असे विश्वजित कदम म्हणाले. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेस हे सगळे मविआचे घटक आहेत. मविआ म्हणून राज्यात एकत्र राहण्याची काँग्रेसची स्पष्ट भूमिका आहे. शरद पवार आमच्यासोबत आहेत. त्यामुळे कसलीही चिंता नाही. अजित पवार महायुतीसोबत गेल्याने मविआवर कोणताही परिणाम झाला नाही, असेही ते म्हणाले.

# कावेरी नदीच्या पाण्याच्या वाटपाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**कावेरी नदीच्या पाण्याच्या वाटपाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. यासंदर्भात कर्नाटकात बंद पुकारण्यात आला होता. गेल्या १४० वर्षांपासून तामिळनाडू आणि कर्नाटकचे लोक या मुद्द्यावर एकमेकांशी भिडताना दिसत आहेत. हे प्रकरण कनिष्ठ न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले, परंतु आजपर्यंत हा वाद मिटलेला नाही. अशा स्थितीत शंभर वर्षांहून अधिक काळ एक नदी दोन राज्यांमधील वादाचे कारण कशी बनू शकते, असा प्रश्न अनेकांच्या मनात येत असेल. तामिळनाडू आणि कर्नाटकमधील कावेरी पाण्याचा वाद काय आहे? कावेरी पाण्याचा वाद १४० वर्षांहून अधिक जुना आहे. या नदीचा वाद १८८१ मध्ये पहिल्यांदा सुरू झाला.**

खरे तर याच काळात कर्नाटकने (त्यावेळी म्हैसूर म्हणून ओळखले जाणारे) नदीवर धरण बांधण्याची मागणी केली, पण तामिळनाडूने त्याला विरोध केला. सुमारे ४० वर्षे हा वाद सुरू राहिला आणि नंतर ब्रिटिश सरकारने त्यात हस्तक्षेप केला.


१९२४ मध्ये, ब्रिटिश सरकारने कर्नाटक आणि तामिळनाडू यांच्यात एक करार केला, ज्यानुसार तामिळनाडूचा ५५६ हजार दशलक्ष घनफूट पाण्यावर आणि कर्नाटकचा १७७ हजार दशलक्ष घनफूट पाण्यावर हक्क होता. ही नदी कर्नाटकातील कोडागु जिल्ह्यातून उगम पावते आणि तामिळनाडूतून वाहत बंगालच्या उपसागराला मिळते, तर तिचा काही भाग केरळ आणि पुद्दुचेरीमध्येही असल्याची माहिती आहे.

पुद्दुचेरी आणि केरळनेही या वादात उडी घेतली तेव्हा १९७२ मध्ये यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने १९७६ मध्ये चार राज्यांमध्ये करार केला. या करारानंतरही नदीच्या पाण्याचा वाद सुरूच होता. त्यानंतर, १९८६ मध्ये, तामिळनाडूने आंतरराज्यीय जल विवाद कायद्याअंतर्गत न्यायाधिकरणाची मागणी केली. वास्तविक, कर्नाटकचे मत आहे की ब्रिटिश राजवटीत घेतलेला निर्णय न्याय्य नाही, तर तामिळनाडू जुना करार तर्कसंगत मानतो.

**सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिला :** अनेक वर्षांपूर्वी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. २२ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये सुरू असलेल्या वादात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. त्यानंतर असे म्हटले आहे की या प्रकरणावर निर्णय घेण्यासाठी CWRC आणि कावेरी जल व्यवस्थापन प्राधिकरणाकडे तज्ञ आहेत. तज्ज्ञ संस्थांनी यापूर्वी कर्नाटकला १३ ते २७ सप्टेंबरपर्यंत तामिळनाडूला दररोज ५,००० क्युसेक पाणी सोडण्यास सांगितले होते. तामिळनाडूने कर्नाटककडे आणखी १० हजार क्युसेक पाणी सोडण्याची मागणी केली, परंतु कर्नाटक सरकारने नकार दिला. कर्नाटक सरकारचे म्हणणे आहे की, यंदा अपुऱ्या मान्सूनच्या पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

कर्नाटकच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, यावर्षी नैऋत्य मान्सूनच्या अपयशामुळे कावेरी खोऱ्यातील चार जलाशयांमध्ये अपुरा पाणीसाठा असून राज्यातील पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची गरज भागवण्यातही राज्याला अडचणी येत आहेत. साठीही पाणी नाही.मुख्य म्हणजे दोन्ही राज्यात पाणीटंचाईची समस्या आहे. चेन्नईच्या काही भागांसह तामिळनाडूतील अनेक जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे.

याबाबत कर्नाटक सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली, मात्र सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने राज्य सरकारला मोठा धक्का बसला. आता कर्नाटकातील शेतकरी आणि संघटना तामिळनाडूला पाणी देण्याच्या



विरोधात असून त्यामुळे बंद पुकारत आहेत. कावेरी जल नियमन समितीने झालेल्या बैठकीत विचारविनिमय केल्यानंतर कर्नाटकला २८ सप्टेंबर ते २८ ऑक्टोबर या कालावधीत ३००० क्युसेक पाणी बिलीगुंडुलुमध्ये सोडण्याची शिफारस केली आहे.दरम्यानकर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले की, कावेरी जल नियमन समितीने (CWDT) तामिळनाडूला आजपासून १५ ऑक्टोबरपर्यंत ३,००० घनफूट प्रतिसेकंद (क्युसेक) वेगाने पाणी सोडण्याच्या निर्देशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाईल. सिद्धरामय्या म्हणाले की ते राज्याच्या कायदेशीर टीमशी बोलले आहेत, ज्याने याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

दरम्यानच्या काळात कर्नाटकात बंदची हाक सीडब्ल्यूडीटीच्या या निर्णयाविरोधात राज्य सरकारने संपूर्ण राज्यात बंदची हाक दिली होती. कर्नाटकातील हरंगी आणि हेमावती धरणे कावेरी नदीच्या उपनद्या असलेल्या हरंगी आणि हेमावती नद्यांवर बांधण्यात आली आहेत. कृष्ण राजा सागर धरण हे कर्नाटकातील मुख्य कावेरी नदीवर या दोन धरणांच्या खाली बांधण्यात आले आहे. कर्नाटकातील काबिनी जलाशय हे कावेरी नदीची उपनदी असलेल्या काबिनी नदीवर बांधले गेले आहे, जी कृष्णा सागर जलाशयाला मिळते.

तामिळनाडूतील कावेरी नदीच्या मुख्य प्रवाहावर मेत्तूर धरण बांधण्यात आले आहे. केंद्रीय जल आयोगाने कावेरीसह काबिनी आणि मेत्तूर धरणाच्या संगमादरम्यान मुख्य कावेरी नदीवर कोल्लेगल आणि बिलीगुंडुलु नावाच्या दोन G&D साइट्सची स्थापना केली आहे. बिलीगुंडुलु G&D साइट मेत्तूर धरणाच्या खाली सुमारे 60 किमी आहे जिथे कावेरी नदी कर्नाटक आणि तामिळनाडूची सीमा बनवते. तामिळनाडू, कर्नाटक, केरळ आणि पुद्दुचेरी या राज्यांमधील आंतरराज्यीय कावेरी पाण्याच्या आणि नदीच्या खोऱ्याच्या संदर्भात पाणी विवाद निकाली काढण्यासाठी भारत सरकारने २ जून १९९०रोजी कावेरी जल विवाद न्यायाधिकरण (CWDT) ची स्थापना केली.

कावेरी जल विवाद न्यायाधिकरण (CWDT) ने २५ जून १९९१ रोजी एक अंतरिम आदेश पारित करून कर्नाटक राज्याला कर्नाटकातील जलाशयातून पाणी सोडण्याचे निर्देश दिले.

कर्नाटकातून चार आठवड्यात चार समान हप्त्यांमध्ये पाणी सोडण्यात येणार आहे. आठवडाभरात आवश्यक प्रमाणात पाणी सोडणे शक्य न झाल्यास त्या आठवड्याचे पाणी पुढील आठवड्यात सोडण्यात येईल. उक्त आदेशाचा विचार केल्यानंतर, भारताचे राष्ट्रपती, दिनांक २७ जुलै, १९९१ च्या भारतीय राज्यघटनेच्या कलम १४३ च्या खंड (१) अन्वये, खालील बाबींवर विचार करण्यासाठी आणि अहवाल देण्यासाठी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला संदर्भित केले. न्यायाधिकरणाच्या दि. २५ जून, १९९१ च्या आदेशात आंतर-राज्य पाणी विवाद कायदा, १९५६च्या कलम ५(२) च्या अर्थानुसार अहवाल आणि निवाडा समाविष्ट आहे आणि म्हणून, या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी, तो संदर्भित आहे या कायद्याच्या कलम ६ मध्ये. या अंतर्गत, ते केंद्र सरकारने अधिकृत राजपत्रात प्रकाशित करणे आवश्यक आहे.

CWDT चा २५ जून १९९१ चा अंतरिम आदेश १०डिसेंबर १९९१ रोजी अधिकृत राजपत्रात अधिसूचित करण्यात आला होता आणि तो या वादासाठी विविध पक्षांना बंधनकारक आणि लागू करण्यासाठी १० डिसेंबर १९९१ रोजी अधिसूचित करण्यात आला होता. हे ISRWD कायदा, १९५६ च्या कलम ६ अंतर्गत आणि भारतासाठी लागू करणे आवश्यक आहे.

# गुणवैशिष्ट्यानुसार उपयोगिता ठरत असते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**फायदा आणि तोटा चांगलं वाईट, सद्गुण अवगुण हित अहित या सगळ्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत.सृष्टी वरील सगळेच लोक चांगले असतील अथवा सगळेच वाईट असतील असं होतं नाही प्रत्येकाची उपयोगिता हि गुणवैशिष्ट्या नुसार ठरत असते .जसे गुण वैशिष्ट्य तसं व्यक्तिमत्व असतं .शेतीतील झाडांच मुल्यमापन करताना आपण उपयोगिता हाच निकष लावतो. त्यामुळे शेतातील झाड जसं चंदन, अंबा, सफरचंद, काजु फणस, केळी, जांभळं अशी अनेक झाड उत्तम व स्वादिष्ट फळ देत असतात तर सुबाभुळ, येडी बाभुळ, काटे कुपाटी असणारी झाड अनेक उपद्रव देतात. तर काही झाड उत्तम सावली देतात.**

म्हणजे स्वादिष्ट फळ उत्कृष्ट सावली व उपद्रव हे त्या त्या झाडाच्या गुणवैशिष्ट्या नुसार ठरत असतं.साधारणतः शेतात अनेक प्रकारची झाड उगवत असतात. पण त्यापैकी प्रत्येकाच गुण वैशिष्ट्य आणि उपयेगिता हि वेगवेगळी असती. त्यानुसार त्यांचं महत्त्व देखिल ठरत असतं. झाडाच महत्व हे उगवण क्षमतेवर नाही तर उपयोगिता कशी आहे यानुसार ठरत असतं आणि लोक वापर सुद्धा गुण वैशिष्ट्य नुसारच करत असतात. त्याच पद्धतीने समाजात जन्माला येणारी कोणत्याही जाती धर्मातील माणसं हि सगळी सारखीच असतील असं कधीच होत नाही. ज्या पद्धतीने बरीच झाड ही शेतकऱ्यांच नुकसन करण्यासाठी अथवा त्या नुकसानाला हातभार लावण्यासाठी प्रकट होत असतात त्याच पद्धतीने बरीच माणसं समाज हित करण्या ऐवजी समाजाचे अहित कसं करता येईल यासाठीच नित्याने प्रयत्नशील असतात. अथवा हातभार लावत असतात हे अगदी कटु सत्य आहे. शेतकरी किंवा शेत हे कोणालाही उगवण्या पासुन प्रतिबंध करू शकत नाही अथवा ते आडवत तर नक्कीच नाही.उलट उगवण्याची संधी हि प्रत्येकाला सम प्रमाणात निसर्ग देत असतो .पण शेवटी उपयोगिता हि गुण वैशिष्ट्या नुसार ठरत असते . शेवटी उपयोगी ठरण हे गुण वैशिष्ट्या नुसारच ठरत .तसंच समाजात विविध क्षेत्रात विविध माणसं जन्मा नंतर प्रवेश करू शकतात प्रत्येकाला आपलं योगदान हे त्या त्या क्षेत्रात देण्याची इच्छा शक्ति असते पण शेवटी अंतिम फल निष्पत्ती ही गुण वैशिष्ट्या नुसार ठरत असते .मुख्य उद्दिष्ट व सातत्य या नुसार आपलं कार्य हे लोक उपयोगी लोक कल्याणकारी ठरलं तर ते टिकुन राहत असतं अन्यथा शेतात उगवलेली गवताची अनेक झाड असतात त्या प्रमाणे उगवण्यासाठी कोणतीही बंदी नाही अडचण नाही पण टिकुन राहण्यासाठी गुण वैशिष्टये ही आवश्यक आहेत तेव्हच शेतकरी आणि समाज हे संगोपन करत असतात. शेतातील झाड व समाजातील माणसं यांना आपली उंची निर्माण करण्यासाठी समान संधी असते.पण काही ठराविक झाड व ठराविक माणसं हिच योग्य ठिकाणी योग्य उंची वर पोहचातात .प्रयत्न सगळेच करतात प्रयत्न करण्यात कोणीही सहजासहजी कमी पडत नाही. प्रयत्न करणं गैर नाही. आपल्या मध्ये असणार्या गुण वैशिष्ट्या नुसारच टिकुन राहण अथवा योग्य उंची गाठण हे अंवलबुन असत. म्हणून जशी शेतात अनेक वेगवेगळ्या प्रकारची झाड हि उगवत असतात .अगदी तशीच समाजात सुद्धा वेगवेगळ्या प्रकारची अनेक माणसं जन्माला येऊन वेगवेगळ्या क्षेत्रात मार्गक्रमण करत असतात. झाड उगवण आणि माणसं जन्माला येणं हे जवळपास सारखच असतं. पण टिकून राहणे अथवा लोक उपयोगी ठरण किंवा लोक कल्याण करण्यासाठी उपयोगी पडण यावर सगळं अवलंबून असतं . जसं लोक उपयोगी झाड हि शेतात मोजकीच शिल्लक राहतात .काही झाड हि वादळ वारा या मुळे नाहीशी होतात .तर काही शेतीला अपायकारक होतात म्हणून तोडली जातात तर काही स्वतः च्या अवगुणामुळे उन्मळून पडतात तर काही लाकुड फाटा म्हणून तोडली जातात. तर काही नैसर्गिक आपत्ती मुळे नष्ट होतात. म्हणजे उगवण्यासाठी सगळ्यांना समान संधी उपलब्ध आहे .पण टिकुन राहण्यासाठी मात्र कसरत आहे. आणि टिकायचे म्हणजे गुण वैशिष्ट्य महत्वाचे आहेत. असंच काहीसं माणसांचं पण असतं समाजात अनेक माणसं वेगवेगळ्या क्षेत्रात प्रवेश करत असताना आपलं आयुष्य घडविण्यासाठी प्रयत्न करत असतात पण त्या क्षेत्रात शेवट पर्यंत आपल्या गुण वैशिष्ट्या नुसार ती टिकतात अशी माणसं समाजात अगदी बोटावर मोजण्या इतकी असतात .मग आपला नंबर नेमका कोणत्या मोजमापात लागला पाहिजे हे आपल्या अंगी असणार्या गुण वैशिष्ट्या नुसार ठरत असतं .शेतात प्रत्येक झाडाला वाढण्याची समान संधी असते . तसंच समाजात प्रत्येक व्यक्तिला आपली क्षमता नेतृत्व गुण किंवा आपली लोक उपयोगिता सिद्ध करण्याची समान संधी असते.ऋतु नुसार उगवणारी पण झाड असतात मात्र त्यांचं अस्तित्व त्या ऋतु पुरत मर्यादित असतं. ऋतूनुसार उगवणारी झाड शेताच नैसर्गिक सौंदर्य नष्ट करण्यासाठी प्रयत्न करतं असतात हे अगदी वास्तव आहे. वेगवेगळ्या प्रकारची झाड उगवण हे नैसर्गिक आहे. पण प्रत्येक झाडाच गुण वैशिष्ट्य हे वेगळं असतं. काही झाडांच महत्व लौकिक हे लोक उपयोगी कल्याणकारी असत तर काही झाड ज्या जागेत ज्या जमिनीवर उगवली त्या जागेला त्रास दायक ठरतात. तसंच मानवाचं आहे समाज जात धर्म कोणताही असू द्या त्या त्या समाजात जन्माला येणारी अनेक माणसं ही आप आपल्या गुण वैशिष्ट्या लोक कल्याणकारी लोक उपयोगी त्याच बरोबर लोक निरुपयोगी ठरत असतात फक्त वाढण टिकण हे महत्त्वाचे नसून लोक उपयोगी होणं हे महत्त्वाचे आहे. महत्त्व उगवण्याला नाही तर उपयोगी ठरून टिकुन राहण्याला असतं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राजूर येथे मराठा समाज संवाद यात्रा जनजागृती प्रचार रथाचे पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन उभे करणारे मनोज जरांगे पाटील यांची 30 ऑक्टोबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात संवाद यात्रा सुरू झाली असून या दरम्यान ते मराठा समाजाशी संवाद साधणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून 10 ऑक्टोबर रोजी राजूर येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी प्रचार रथ तयार करण्यात आला असून राजुरेश्वराच्या पायथ्याशी श्रीफळ व पुष्पहार अर्पण करून रथाचे पूजन करून जनजागृतीस प्रारंभ करण्यात आला. या प्रचार रथाच्या माध्यमातून परिसरातील गावात जाऊन मनोज जरांगे पाटील यांच्या सभेविषयी माहिती देण्यात येणार आहे. हा रथ आकर्षक पध्दतीने सजवला असून त्यावर लाऊडस्पीकर बसवले आहे. या प्रचार रथामार्फत गावोगावी जाऊन मराठा समाजबांधवांत जनजागृती केली जाणार आहे. प्रचार रथासोबतच मराठा समन्वयक गावोगावी जाऊन बैठका घेतल्या जाणार आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणावर सभेसंदर्भात जनजागृती केली जाणार आहे. प्रचार रथाच्या माध्यमातून मराठा समाजाला आरक्षण का हवे आहे याचे महत्व पटवून सांगितले जाणार आहे. सभा होईपर्यंत हा रथ गावोगावी फिरणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या सभेचा प्रचार होऊन जास्तीत जास्त मराठा समाज बांधवांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे म्हणून हा रथ तयार करण्यात आला आहे. आज सकाळी राजुरेश्वराच्या पायथ्याशी पूजन करून रथाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी सकल मराठा समाज बांधवं उपस्थित होते.



## सार्ड संस्थेतर्फे वन्यजीव सप्ताहनिमित्त सायकल रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सार्ड संस्था चंद्रपूर आणि ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर यांचे संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहनिमित्त सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले, वन्यजीव व पर्यावरण यांचे संरक्षण आणि संवर्धन करा हा संदेश घेऊन रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीकरिता मोहूर्ली वनपरीक्षेत्राचे अधिकारी थिपे साहेब यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरवात झाली. सायकल रॅली जटपुरा गेट पासून सुरवात होऊन अंचलेश्वर गेट-पठाणपूरा गेट- बिनबा गेट ते वरोरा नाका या ठिकाणापर्यंत करण्यात आली. या रॅलीला पर्यावरणतज्ज्ञ सुरेश चोपणे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष भाविक येरगुडे, विलास माथनकर, सुबोध कासुलकर, नितीन डोंगरे, मंगेश लहामगे यांनी रॅली यशस्वी करण्याकरिता विशेष परिश्रम घेतले. या रॅलीमध्ये महेंद्र राळे, वसंत वडस्कर, सचिन ढेंगळे, सुभाष पाऊनकर, श्रीजा येरगुडे, श्रीअंश येरगुडे, सचिन निंबाळकर, राजू पिदूरकर, दिलीप नेरलवार, अमित कुकडवार, अनंत भूषकमवार, विवेक दुबेवार, विवेक टहलानी, राजू मडमवार, स्वप्नील गुंडावार, अमित अदेटीवार, विजय नेरलवार, मुक्तेश्वर मेश्राम, किशोर तुमेवार इत्यादींनी सहभाग घेतला.



## पावसाची उघडीप, शेतकऱ्यांकडून कापसाला पाणी भरणी फवारणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात उतरा नक्षत्रांच्या पावसानंतर उघडीप झाल्याने आता शेतकऱ्यांनी कापसाला पाणी भरणी आणिऔषध फवारणी कामे हाती घेतले आहे. यंदा पावसाळा आटोपता आला परंतु अर्धा पाऊस झाला नाही की ओढे नाले नदी तलाव विहिरीना पाणी न येता कोरडेठाक पडून आहे. खुलताबाद तालुक्यात यंदा ५०%टक्के ही पाऊस न झाल्याने तलाव विहिरीना पाणी आले नाही.

यांचे परिणाम भोगावे लागतील असे वाटते. तुरळक पावसावर खरिप पिक हंगामातील पिके आली खरी परंतु ऐन बी भरणा वेळी पावसाने खंड दिल्याने पिकात कणसात बी भरणा होत नाही. तर सोयाबीन भुईमूग तूर बाजरी मका कापूस सर्वांना पावसाची पाण्याची गरज आहे. परंतु पाऊस पाणीच नसल्याने शेतकऱ्यांनी उपलब्ध विहिरितील पाण्यावर कापसाची पाणी भरणा सूरु केली असून फवारणी कामे अटोपती घेत आहे. शेतमालाची स्थिती जोरदार चांगली असून पिके हिरवीगार टवटवीत फडफडताना दिसून येते आहे.



## खुलताबाद तालुक्यात पन्नास टक्केही पाऊस नाही, ओढे नाले नदी कोरडेच


आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात यंदा ५०% ही पर्जन्यमान पाऊस न झाल्याने ओढे नाले नदी तलाव कोरडे ठाक पडून असल्याचे चित्र आहे. खुलताबाद तालुक्यात तीन महसुल मंडळ असुण सावंगी बाजार, वेरुळ, सुलतानपूर असी मंडळे आहेत. मृग नक्षत्रात नावाला पाऊस झालं ते कोरड गेलं तर आर्द्रा नक्षत्रात तिनचार तुरळक पाऊस झाले. पूनर्वसु व पुष्य मधे व आश्लेषा -मघा -पुर्वा यांनी ही कमाल दाखवला नाही. शेतकऱ्यावर कधी कोरड्या तर कधी ओल्या दुष्काळाचे गडद सावट पसरत आहे.र ब्बी बरोबर खरीप हंगाम आता हातचा गेल्यातच जमा आहे.नै सर्गिक आपत्ती,रोगराई यामुळे शेतकरी पुरता आर्थिक अडचणीत सापडला आहे. उतरा नक्षत्राने जाता जाता जोरदार फटकेबाजी केली. अकरा नक्षत्रातील एकानेही यंदा पावसाळा म्हणून दमदारपणे पाऊस पाडला नाही. ऐवढेच काय पुर्ण पावसाळ्यात ओढे नाले नदी तलाव विहिरीना मोठ्या पावसा अभावी पुरपाणि आले नाही. आज उद्या म्हणत पुर्ण पावसाळा संपला तरी मोठा पाऊस व पुरपाणी नदीनाल्यांना आले नसल्याने शेतकरी व नागरिक चिंतीत आहे. खुलताबाद तालुक्यात महसुल मंडळ निहाय पर्जन्यमान याप्रमाणे सावंगी बाजार महसूल मंडळ ४५०मिलीमिटर पाऊस, सुलतानपूर महसूल मंडळ ४२५मिलीमिटर पाऊस, वेरुळ महसूल मंडळ ६७३ मिलीमिटर पर्जन्यमान पाऊस झालेला आहे. म्हणजे वर्षिक सरासरीत अर्धा ५०%टक्के पाऊस झालेला आहे हे विशेष.




महाराष्ट्र Business Katta









# रझाकारमध्ये हिंदूंवरील अत्याचाराचा थरार



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**'रझाकार'पुस्तकात हिंदू अत्याचारांच्या व्यथा. महाराष्ट्रातील व्यंगचित्रकार प्रसिध्द असलेले बाबु गंजेवार यांचा प्रवास आता साहित्यिक क्षेत्राकडे वळलेला आहे. तसे ते चिकित्सक,अभ्यासू आहेत. त्यांनी 'झेंडू' मासिक काढण्यापूर्वी प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे व माझ्याशी चर्चा केली होती. तेव्हा आम्ही त्यांना मासिक काढणे हे आर्थिक आणि व्यवहारिकदृष्ट्या पडवणारे नाही, असे सांगितले होते. तरीही बाबुरावांनी ते मासिक काढण्याचे धाडस केले. झेंडू मासिक दर्जेदार होते! मार्मिकमध्ये स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी रेखाटलेली सर्व राजकीय नेत्यावरची व्यंगचित्रे यावयाची. त्याला राज्यातील वाचकांची मान्यता होती.**

याच तोडीचे झेंडू मासिक असावे,अशी बाबुरावांची इच्छा! तसे प्रयत्नही झाले.झेंडू मासिक प्रकाशित झाले पण काळ प्रकाशित होवू शकले नाही.नांदेड येथे बाबुरावांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील व्यंगचित्रकार चित्र प्रदर्शन भरविण्यात होते होते. याळी नांदेडकरांना कलाकरांना भेटता आले. त्यांची चित्रे पहाता आली. तसे ! बाबुरावही मोठे व्यंगचित्रकार आहेत. त्यांची राज्यातील प्रमुख वृत्तपत्रात त्यांचे व्यंगचित्रे प्रसिध्द झाली असून ती आजही प्रसिध्द होतात! त्यांची समाज माध्यमावर व्यंगचित्रे देण्यास सुरुवात केली होती.यांनी एका राजकीय नेत्यावरचे इतिहासाचा दाखला त व्यंगचित्र होते.ते समाजमाध्यमावर झळकताच त्यांना धमक्या देण्यात आल्या. ज्यांना व्यंगचित्रकारांची भाषा व अर्थ समजत नाही, अशा अज्ञानी, टोळक्यांनी त्यांचेवर घाणेरडे आरोप व राजकारण केले गेले.बाबुरावांचे मनातही महापुरूषाचा अवमान करण्याचा विचार येणार नाही.ते त्या विचारसरणीचे नाहीत,हे माहित असून सुध्दा त्यांना दोषी ठरवत त्या एका व्यंगचित्राबाबत माफी मागण्यास भाग पाडले.पण घटनेवर मात्र राज्यातील व्यंगचित्रकर व लेखक,विचारवंतानी मौन पाळले.याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली नाही.समाजातील अज्ञानी व गुंडासमोर ज्ञानी माणसाचे शहाणपण चालत नाही. त्यानंतर त्यांनी समाज माध्यमावर व्यंगचित्र टाकणे बंद केले.महाराष्ट्रात व्यंगचित्रावर आलेले पहिला प्रसंग असावा! देशात २०१२ मध्ये पुस्तकात आलेल्या डॉ आंबेडकर यांचेवर १९४० राज्य निर्मितीवर प्रसिध्द व्यंगचित्रकार शंकर यांचे व्यंगचित्रावरुन वाद उकरुन काढला गेला होता.पण तेंव्हा बाबासाहेबांनी या चित्राला विरोध केलेला नव्हता! नामवंत व्यगंचित्रकारांनी राजकारण्याची झोप उडवली होती. सामान्य जनतेचा आवाज होता! बाबुरावांचे पहिले पुस्तक चाणक्ष,नंतर कोपरखळी हे प्रकाशित झाले. ते चर्चेत राहिले.आता त्यांचे तिसरे हैद्राबादमुक्ती संग्रामावर 'रझाकार' पुस्तक प्रकाशित करण्याचे धाडस त्यांनी केले आहे!त्यांनी हे मला का पाठविले? हेच समजले नाही! मी जातीने पत्रकार असल्याने सामाजिक राजकीय विषयावर लेखान करत असतो.राज्यातील लेखक,साहित्यिक विचारवंत, पत्रकारांनी बिनधास्त लिहिले पाहिजे,पण आपल्या मतावर ठाम असले पाहिजे.मग ते कोणाला आवडो,अथवा ना आवडो!याची चिंता करू नय!

बाबुरावांचे रझाकार हे पुस्तक वाचले.तेंव्हा त्यांनी या पुस्तक लिहिण्यामागची भूमिका स्पष्टपणे मांडलेली आहे.आज देशात हिंदू व मुस्लिम अशी टोकाची भूमिका घेतली जात आहे,त्यावर दोन्ही समाजात एकोपाचा यावर भर दिला आहे.हैद्राबाद निजाम संस्थानमध्ये स्वतंत्र कसे झाले? त्यावर घटनांचे वर्णन अनेक पुस्तकात वाचायला मिळते. पण या पुस्तकात रझाकाराची हिंदू समाजावर केलेले जुलूम व अत्याचाचाची सविस्तर माहिती आहे. त्यांनी या पुस्तकाकाठी सेतू माधवराव पगडी,नरहर कुरूंदकर, शेषराव मोरे,सुधाकरराव डोईफोडे, दया पवार,वसंत पोतदार, वि.गो ब्रह्मनाथकर, केशवराव धोंडगे, प्रा. नरेंद्र गायकवाड, प्रा. अनिल कठारे, पांडव, अशोक परळीकर, सुधीर देशपांडे, व धनजंय कुलकर्णी,अमोल अंबेकर आदींची पुतस्के, संग्राहालतील लेखाचा यासाठी संदर्भ घेतला आहे. त्यांनी लिहिताना दख्खणी शब्दांची उत्तमपणे मांडणी केली आहे. यात उर्दू, मराठी व कन्नडी तीन भाषांचे मिश्रण आहे.यात एससान फरमोष! फर्मान,हुकुम, बुतरपस्त,पस्ता फंड मख्खीचूस, नजराणा!पस्ताकौम आदी शब्द लिखणात वाचण्यात येतात! त्यांच्या भाषेत घटना लिहिल्या आहेत!त्यामुळे पुस्तक वाचताना घटना डोळ्यासमोर उभे राहतात!रझाकार पुस्तकात हिंदु धर्माबाबतच्या भावना,वेदना अत्याचाराबाबत परखडपणे मत मांडलेले आहे.ते म्हणतात,भारतात बहूसंख्य हिंदू समाज असताना 'अल्पसंख्याक मुस्लिमांनी व इंग्रज बहूसंख्य भारतातील हिंदूना टाचेखाली ठेवत हजारो वर्षे राज्य केले.पण हिंदू समाज जागा झाला नाही. तो एकत्रित होऊन कधीच लढलेला नाही. तो अन्याय सहन करत राहिला आहे.खर आहे!' आज हिंदू धर्मावर टिका करणारे म्हणजे धर्म धर्मनिरपेक्ष ती व्यक्ती स्वत मानतो! इतर धर्मावर जर त्यांनी टिप्पणी केली की!'सर तनसे जुदा'ची धमकी मिळते!वास्तविक कोणत्याही धर्मावर टिका करणे करू नये! हिंदू वृत्त वाहिन्यावर तर हिंदू व मुस्लिम अशा चर्चा रोज करविल्या जातात! यातून प्रत्येक धर्माचा ठेकेदार माझा धर्म मोठा समजता! चर्चेतून दुसऱ्या धर्माची लक्तरे बाहेर काढली जातात! अशा संवदेनशील विषयावर चर्चा उघडपणे करून साध्य काय होणार? उलट केवळ तरूणांचे धर्माच्या नावावर माथे भडविणे आहे,याला बंदी घातली पाहिजे.भारतीय हिंदू समाज हा सोशिक, पापभिरू, सहिष्णू वृत्तीचा आहे,असे असताना मग हिंदु व मुस्लिम व्देषाचे कारण काय आहे?त्यांनी इस्लाम धर्माबाबत कुराणातील काही संदर्भ दिले आहेत.त्यात 'अल्ला प्रेषित न माणऱ्यांना लोकांचे हात पाय तोडा,त्यांना क्रूसवर लटकवा.{ कुराण ५:३३ ) तसेच 'प्रेषित म्हणतात, अल्ला व इस्लामला न मानणाऱ्या लोकांचे खून करणे ही आमच्यासाठी किरकोळ बाब आहे'. तबरी ( ९:६९ ) जगातील मुस्लिमांची मानसिकता हिच आहे.मुस्लिम समाज कुराणमध्ये चांगल्या शिकवणी आचरणात का आणत नाही? सातवा निजाम मीर उस्मान अली व बहाद्दूर यार जंग व रझाकार प्रमुख कासीम रिझवी यांनी याच मानसिकेतून हैद्राबाद संस्थान मध्ये हिंदू धर्मियांचा छळ केला. प्रत्येक धर्म श्रेष्ठ म्हणण्याचा अधिकार आहे! पण आमचा धर्म स्विकारेल त्यालाच जगण्याचा अधिकार आहे, अशी टोकाची भूमिका घेतली जातेय!त्यातून हे हिंदू व मुस्लिम प्रश्न निर्माण होत आहेत. यात सर्व मुस्लिमांना दोष देता येणार नाही!कारण अनेक सुधारणावादी व देशभक्त मुस्लिम नेते होवून गेले व आहेत! आहेत.भारताचा इतिहासात सहिष्णु मुसलमान 'दारा शिकोह' यांचे नाव घेतले जाते. त्यांनी भागवत गीतेचा अनुवाद केला.विव्दान अब्दुल्ल फजल यांनी तर उपनिषादाचे फारशीत अनुवाद केले.तर अश्फाउल्लाखान हे देशासाठी फासावर गेले, देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात अनेक मुस्लिम नेत्यांचे योगदान आहे,हे नाकारता येत नाही. हैद्राबाद संस्थानातही हिंदू व मुस्लिम भेदभाव न करता काही संस्था उभारल्या गेलेल्या आहेत.हिंदू धर्मात इतर धर्माचा आदर करणे,शिकवण आहे. जगात भारतात बहूसंख्य हिंदू असल्याने हिंदु व मुस्लिम सुरक्षित आहे.घटनेने धर्म स्वातंत्र्य दिले आहे.देशात सरकार धार्मिक भेदभाव करत नाही.पण




आजही देशात राजकीय पक्ष केवळ मताचे धुव्रीकरण करण्यासाठी धर्माचा कुबड्या घेत आहेत! त्यात भारताची फाळणी धर्माच्या आधाराराव झालेली चूक व जखम लक्षात घेता विवेकी मुस्लिमांनी प्रामाणिक प्रयत्न करण्याची गरज आहे. तसेच हिंदूनी 'जे झाले ते गंगेला मिळाले' असे म्हणून विसरले पाहिजे.या दोन समाजानी राष्ट्राच्या नवीन उभारणीच्या अध्यायास सुरुवात करावी. पण दुर्देवाने तसे होत नाही.स्वातंत्र्यानंतर भारतातील मुस्लिम बांधवाना चांगली संधी होती.कारण परकीयांनी अतिक्रमण करून सुमारे दोन लाखाच्यावर हिंदूची मंदिरे उध्वस्त गेली. त्यावर मस्सिदी बांधल्या गेल्या आहेत! हा इतिहास आहे. भारताची हिंदू समाजांची आस्था असलेले अयोध्या, मथूरा व काशी मंदिर देण्याचा प्रस्ताव ठेवला होता,तेंव्हा जर मुस्लिम समाजाने उदारता दाखवत तीन धार्मिकस्थळे स्वच्छेने हस्तांतर केली असती तर जगात हिंदू व मुस्लिम एकात्मतेचा संदेश गेला असता, असे लेखकांनी व्यक्त केले आहे.या पुस्तकाला प्रा. तसलिन पटेल यांची प्रस्तावना असून ती सडेतोड आहे.आपल्याला. समाज काय म्हणेल! याची त्यांनी पर्वा केली नाही. त्या म्हणतात,'शासक हा मातृभूमीत जन्मलेला असेल तर जनसामन्यांचे प्रतिनिधीत्व करू शकतो' हैद्राबाद संस्थानात बहूसंख्य हिंदू असताना त्यांचे जूळवून घेणे आवश्यक होते. पण शेवटचा निजाम हा धर्मांध व क्रूरपणे वागला.या संस्थानात जुलूम व अत्याचाराचा आलेख वाढत गेला.त्यामुळे क्रियेनंतर प्रतिक्रिया घडलेल्या आहेत.जेंव्हा सहनशक्तीचा अंत होतो. तेव्हा हातात शस्त्र घेणे गरजेचे ठरते.यामुळेच हैद्राबाद संस्थानमधील गांधीवादी व शांतीदूतांना हातात शस्त्रे घेण्याची वेळ आली.मागील घटना लक्षात घेता नव्या पिढींनी तरी अंतर्मुख होऊन विचाराची दिशा बदलावी,जेणे करुन हिंदू बांधवाबरोबर स्नेह सबंध कायम राहतील,असा सल्ला त्यांनी दिलेला आहे. रझाकाराचे म्होरक्या कासीम रिझवी यांच्या टोळीने गावो-गावी केलेले अत्याचार, खून,लूट आणि बलात्कार या घटना गुळगुळीत न लिहिता बेधडकपणे मांडल्या गेल्या आहेत.त्याचप्रमाणे वेदप्रकाश,पुंडलिक पाटील, गोविंद पानसरे,शोअब मोहम्मद,यांची क्रूरपणे झालेल्या हत्येचे प्रसंग वाचताना डोळ्यासमोर उभे राहतात. कल्हाळी गावाला रझाकारांनी वेढा घातला व त्याला गावकऱ्यांनी कसा सामना केला हे वाचताना अंगावर शहारे येतात!यातील एक घटना वरंगल जिल्ह्यातील भैरवपुल्ली घटना! पाच- सात ब्राह्मण श्रध्दाचे पोटभर जेवण करुन चालले होते!वाटेत रझाकार टोळीने,त्यांनी हटकले, तेंव्हा भट गयावया करू लागले!त्या टोळीने त्यांचे हात बांधले!वडाच्या झाडांना तीन फुटावर लटविले त्याखाली काटक्या कुटके जमा करुन जाळ लावला.यात हे ब्राह्मण भाजलेल्या वांग्याप्रमाणे करपून मेली! चिंताकुट्टी गावात तर पुरुषांना एका खोलीत डांबले! बायकांच्या अंगावरुन दागीन ओरबडून घेतले!एका बाईची अंगठी निघत नाहीम्हणून जंबियांनी बोट तोडली!लग्न झालेल्या मुलींना तलवारीने धाक देत कुटुंबासमोर भोगले! अश्या हिंदू कितीतरी महिलांना मौज म्हणून उचलून नेले! अश्या भयानक घटना या पुस्तकात वाचवयास मिळतील!या रझाकारांनी दलित कुटुंबावर सुध्दा अत्याचार केले..वरंगल येथे सातशे दलित कुटुंबाचे धर्मातर केले!याचा उल्लेख आहे.त्यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर हैद्राबाद संस्थानला मराठवाड्यातून भेटीस गेले होते, त्यांचे हैद्राबाद संस्थानबद्दल मत व्यक्त केले व्यक्त केले! त्यांनी त्यावेळेस दलित समाजाला निजामच्या विरोधात उभे रहा,असा सल्ला दिला होता.डॉ.आबेडकरांनी भारताच्या फाळणी करणार असाल तर जोपर्यंत शेवटचा मुसलमान भारतातून गेयानंतर फाळणी पूर्ण करावी. असा दिला होता. पण भारत सरकारने तो सल्ला ऐकला नाही. याचा उल्लेख पुस्तकात आहे. तसेच इस्लाम धर्माबाबत त्यांचे भूमिका होती, त्याची माहिती आहे! खर तर ! भारतातील हिंदूची उदार मानसिकता असताना देशाच्या फाळणीनंतर हैद्राबाद संस्थान मधील विवेकी मुस्लिम समाज गप्प का राहिला? याचे परिणाम आज हिंदु व मुस्लिम समाजाला व देशाला भोगावे लागत आहोत, आम्ही भारतीय समाज म्हणून सगळे एकत्र येत नाहीत,अशी खंत बाबु गंजेवार पुस्तकात व्यक्त केली आहे.हे पुस्तक सर्वांनीआवश्य वाचावे! नवीन महाराष्ट्रातील तरुणांना रझाकार या अत्याचाराचा इतिहास माहितच नाही!तो वाचवा तेंव्हा भारतात हजारो आतापर्यंत 'हिंदू धर्म खतरमे' होता! हे लक्षात येईल!

# नारीशक्ती वंदन बिल आणि वास्तविकता



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महिलांनी प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी भारतीय संविधानाने प्रत्येक स्त्रियांना बहाल करून व त्याचे संरक्षण करून महीलांना वंदनच नाही तर सन्मान ही केला आहे. शिक्षण नोकरी मध्ये आरक्षण देऊन महिलांची सामाजिक व शैक्षणिक प्रगती झाल्याने प्रत्येक क्षेत्रात महिलांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. बोलण्यापासुन तर अधिकारी होण्यापर्यंत सर्व हक्क अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांनी देऊन पुरुषांच्या रांगेमध्ये समान पातळीवर स्थान दिले. हिंदु कोडबिलाच्या माध्यमातून महिलांना सोन्याचे व सन्मानाचे दिवस येत असल्याने हिंदु कोडबिलाला कडाडून विरोध करणारे व महिलांना हक्क अधिकार नाकारणारे आजही सत्तेत आहेत.**

परंतु हिंदू कोडबिल वेळेवर पास होत नाही म्हणून महिलांच्या माना सन्मानासाठी व हक्क अधिकारासाठी मंत्रीपदाचा त्याग करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव महापुरुष होत. महिलांच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी वेळोवेळी उपाययोजना कराव्यात यासाठी संविधानामध्ये तरदुत केली. परंतु महिलांनी संविधान वाचले नाही आणि सरकारने कधी समजून सांगितले नाही. महिलांना हक्क अधिकार, मान सन्मान देऊन त्याचे संरक्षण करण्याचे काम भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले. परंतु याची जाणीव महिला आणि बहुतांश लोकांना राहलीच नाही. महिलांना हक्क अधिकार बहाल करणारे महामानव अजूनही महिलांना कळाले नाही हि शोकांतिका आहे. आता भारत सरकारने नारी शक्ती वंदन बिल संसदेमध्ये मंजूर करून महिलांचा सन्मान करण्याचे ठरवले.परंतु मुळ मुद्दा हा आहे की बिल मंजूर करून नारी शक्तीला वंदन होणार आहे का? बिला व्यतिरिक्त या सरकारने महिलांचा सन्मान होईल असे काम केले आहेत का? बिल मंजूर करून महिलांना संसदेमध्ये स्थान देणे योग्यच आहे. परंतु राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून घराणेशाही महीलानांच संधी मिळाली तर राजकीय आरक्षण कुचकामी ठरेल. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कर्तृत्ववान महिलांना आरक्षणाचा लाभ झाला तर ते आरक्षण मजबूत ठरेल. मुख्य मुद्दा हा आहे की नारी शक्तीला वंदन बिलाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकार ने वास्तविक पणे महिलांचा सन्मान किती केला याची ही चर्चा होणे आवश्यक आहे. कारण केवळ निवडणूकी पर्यंत वातावरण चांगले करण्याचा प्रयत्न करून महिला अत्याचार आपण विसरू शकत नाही. महिला अत्याचार सर्व सामान्य लोकांनी केले आणि सरकारने न्याय दिला तर अत्याचाराचे प्रमाण कमी होते पण येथे अत्याचार करणारे सत्ताधारी पक्षाशी संबधित असतील आणि सरकार न्याय देत नसेल तर याला महिला सन्मान म्हणायचे का? बिलकीश बानो बलात्कार आरोपींना तुरुगांतुन बाहेर काढून त्यांचे स्वागत करायचे आणि पेडे वाटायचे याला हे कृत्य संस्कृती मध्ये तरी बसते का? बलात्कार आरोपींना तुरुंगातून सुटका करणे आणि पेडेवाटून आनंद व्यक्त करणे असे माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य सत्ताधारी पक्षाकडून होत असेल तर नारी वंदन बिलाचा काय फायदा? सरकारने बलात्कारी आरोपींना सोडून नेमकं काय साध्य केले? असे अनेक प्रश्न आहेत ज्याचे उत्तर सरकार देणार नाही परंतु कृत्य हे नैतिकता, जबाबदारी यांच्या विरूद्ध आहेत. सरकारने वास्तविक पणे महिलांचा सन्मान केल्याचे दाखले शोधुनही सापडणार नाहीत. हाथरस मधील घटना आठवली तर आजही अंगावर काटा येतो. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून रात्रीच जाळून टाकले जाते. आणि आरोपी ना शिक्षा होण्यासाठी आंदोलन करावे लागते. मिडिया सोशल मिडियावर बंधने घालुन दबाव आणला जातो. तेव्हा सरकारला महिला विषयी किती आदर आहे याची प्रचिती येते. जागतिक पातळीवर कुस्ती मध्ये देशाला सुवर्ण पदक मिळवून देणाऱ्या महिला कुस्ती खेळाडू कुस्ती संघाचे अध्यक्ष यांच्या वर लैंगिक शोषणाचे आरोप करूनही कार्यवाही होत नाही. महिला खेळाडू एवढे गंभीर आरोप, पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल होणे अपेक्षित असताना ही आरोपपत्र दाखल होत नाही. ही गंभीर बाब असुनही सरकार जर दखल घेत नसेल तर याला काय म्हणायचं? उलटपक्षी जागतिक पातळीवरील महिला खेळाडू आरोपीची चौकशी होऊन शिक्षा व्हायला पाहिजे या साठी आंदोलन केले जाते. परंतु महिला खेळाडूचे संवीधानीक पद्धतीचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी महिलांची जमीनीवरून फरफटत नेले जाते. महिला आंदोलन करताना आंदोलन ठिकाणचे स्वच्छता गृह, पाण्याची सुविधा, इलेक्ट्रीकल कनेक्शन सर्व सुविधा बंद करुन सरकार माणुसकी हीन वागून जेव्हा महिलांची अवहेलना करतात, ही अवहेलना हा अवमान नारी शक्ती वंदन बिल भरून काढणार का? जे सरकार देशाचा गौरव करणाऱ्या महिलांचा सन्मान करू शकत नाही ते सरकार नारी शक्ती वंदन बिल मंजूर करून नेमकं काय सिध्द करणार आहे? केवळ बोलुन निवडणूकीच्या तोंडावर मताधार मिळवण्यासाठी नारी शक्ती वंदन च्या घोषणा करून चालणार नाही तर नारी शक्ती ला वास्तवात वंदन झाले पाहिजे तरच या महीलांचा सन्मान होईल. बिल मंजूर करून सरकारने महिलांची केलेली अवहेलना भरून काढू शकत नाही. महिलांचा सन्मान हा कागदावर नाही तर मनामध्ये, नितीमत्तेमध्ये आणि संस्कारामध्ये पाहिजे. आज नारीशक्ती वंदन बिलावर चर्चा करून आम्ही महिलांचा सन्मान करतो असे म्हणणारे लोक जर मनिपुर मध्ये दोन महिलांवर बलात्कार करून नग्न धिंड काढली जाते त्यावर सरकार किंवा सरकार च्या वतीने कोणीच बोलत नाही. अशा लोकांना महिला सन्मानावर बोलण्याचा नैतिक अधिकार आहे का? दिड महिन्या पासून मनिपुर जळत होते, हजारो कुटुंब वनवन फिरत होते त्या मध्ये महीलांची अवहेलना झाली असेल तर त्यावर सत्तेत असलेले लोक एकही शब्द बोलत नाहीत, एकही जबाबदार व्यक्ती नैतिक जबाबदारी घेऊन मनिपुर ला भेट देत नसतील आणि त्या विषयावर बोलायला वेळ नसेल तर असे सरकार खरचं महिलांचा सन्मान करते यावर कोणाचा विश्वास बसेल? महिलांवर सरकारच अन्याय अत्याचार करून त्यांना न्याया पासून प्रवृत्त करत असेल तर ते सरकार सन्मान नेमका कोणत्या महिलांचा करणार? सध्याचे सरकार महिलांचा सन्मान करतेय असे म्हणणे म्हणजे मोठा विनोदच आहे. कारण नविन संसद भवनाच्या उद्घाटन कार्यक्रम सोहळ्याला देशाच्या राष्ट्राध्यक्ष महामहीम द्रोपती मुर्मु यांनाच बोलावले जात नाही. राष्ट्राध्यक्ष यांना कार्यक्रमाला बोलावले तर प्रधानमंत्री यांना उद्घाटन करता येणार नाही म्हणून राष्ट्राध्यक्ष यांना डावलून महिलांचा सन्मान केला का? देशाला महिला राष्ट्राध्यक्ष असताना त्यांना डावलून कार्यक्रम केला जात असेल तर सरकार महिलांचा सन्मान करणार तरी कसा? नारी शक्ती वंदन बिल केवळ महिलांना खुश करून मताचे राजकारण केल्या जाते. महिलांचा थोडा जरी सन्मान केला असता तर राष्ट्राध्यक्ष यांना डावलून नवीन संसद भवनाचे उद्घाटन केलेच नसते. जर संसद भवनाचे उद्घाटन शासकीय प्रोटोकॉल नुसार जरी केले असते तर संपूर्ण जगाला भारताच्या राष्ट्राध्यक्ष यांच्या बद्दल माहिती होऊन महिलांचा सन्मान वाढला असता. परंतु राष्ट्राध्यक्ष द्रोपती मुर्मु यांना शासकीय कार्यक्रमात डावलून जगात भारताचे महत्त्व कमी केले. नवीन संसद भवनाचे उद्घाटन द्रोपती मुर्मु यांना डावलून केले तर महीला या दुय्यम आहेत हेच जगासमोर सिद्ध करून दिले. महिला कुस्ती खेळाडू आंदोलन करत असताना आरोपींना शिक्षा होत नाही. महिला कुस्ती खेळाडू यांना न्याय मिळत नाही म्हणून आंदोलनाची दखल घेत भारतीय कुस्ती संघाला जागतिक यादी मधुन काढून टाकले गेले आहे.

हा महिलांचा सन्मानच आहे का? थोडक्यात काय तर महिला वंदन नावाच्या खाली बिल मंजूर करून महिलांचा सन्मान होणार नाही. महिलांचा सन्मान होण्यासाठी महिलांचा माणूस म्हणून स्विकार करणे आवश्यक असते. आज महिला शाळा, कामाचे ठिकाण, मंदिर कोणत्याही ठिकाणी नाही. जात धर्म पाहून महिलांचे शोषण केल्या जाते, जात धर्म बघून महिलांसाठी न्याय माघितला जातो. महिलेला आजही दुय्यम समजून बाजूला केले जाते. विधवा, घटस्पोटीत महिलांच्या हातून चांगले काम करण्यावर बंधने आणली जातात. अशी परिस्थिती देशात असताना महिलांचा सन्मान होईल असे म्हणणे म्हणजे केवळ पोकळ गप्पाच होत. महिलांना सुद्धा आपला मान सन्मान कोणी व कसा दिला? आपला मान सन्मान नेमके कोण करत आहे याची जाणीव होणे आवश्यक आहे. फक्त बिलाला नाव देऊन महिलेचा सन्मान होत नाही, महिलेचा सन्मान करण्यासाठी मनात प्रामाणिक पणा व योग्य नितीमत्ता आवश्यक असते. म्हणून महिला आरक्षण बिल खरचं चांगले आहे. परंतु हे लागु होण्या आधी प्रलंबित महिला खटले निकाली काढून महिलांना न्याय देऊन आरोपींना कठोर शिक्षा झाली आणि नारी शक्ती वंदन बिलाच्या माध्यमातून सध्या आमदार खासदार असलेल्याच घरातील महिला आमदार खासदार होतील तर खरंच सर्वसामान्य महिलांचा सन्मान होईल का? हा प्रश्न कायम राहील.

# आनंदामृत ज्ञानेश्वरी!




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**श्री क्षेत्र भगवान गडाचे विद्यमान महंत, न्यायाचार्य, तत्वज्ञ चिंतक, गुरुवर्य डॉ.नामदेव शास्त्रीजींची टेलिव्हिजनवर मुलाखत ऐकली. त्या मुलाखतीतील शास्त्रीजींची काही वाक्य महाराष्ट्रातील तमाम मराठी भाषिकांचे-उच्च शिक्षितांचे डोळे आणि कान उघडणारी होती. महाराष्ट्रातील अनेक देदीप्यमान, अनमोल ठेव्यापैकी ज्ञानेश्वरी आणि गाथा ही दोन वंदनीय ठेवा आहेत. त्यापैकी आज ज्ञानेश्वरी जयंती! ग्रंथ हेच गुरु आहेत! आपण न बोलता, न विचारता ग्रंथ आपल्याशी संवाद साधतात. आपण ग्रंथांना काहीही न मागता ग्रंथच आपल्याला सर्व काही प्रदान करतात. ग्रंथ दु:खीतांना प्रसन्न करतात, तुटलेल्यांना सांधतात, निराश्रीतांना आसरा देतात, भुकेल्यांना अन्न देतात एवढेच काय मरणासन्न लोकांना नवजीवन देण्याचे महत्कार्य ग्रंथच करत असतात.**

याचे सुंदर उदाहरण म्हणजे संत तुकारामांचे आद्य चरित्रकार श्री कृष्णाजी अर्जुन कदम म्हणजेच श्री केळुसकर गुरुजी तुकाराम गाथा वाचून कर्करोग मुक्त झाले असे त्यांनीच संत तुकाराम महाराजांच्या चरित्राच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. विनासायास मानवी जीवनाला ललामभूत ग्रंथच असल्यामुळे मानवी जीवनात त्यांचे महत्व अनन्यसाधारणच आहे! अनेक ग्रंथ आपल्याला पथदर्शी होतांना त्यातील एक मैलाचा दगड ठरलेला आणि दगडांनाही प्रज्ञावंत करणारा बहुमूल्य ग्रंथ म्हणजे संत ज्ञानदेवांनी श्रीमद् भगवतगीतेवरील सर्वांगसुंदर टीका श्री ज्ञानेश्वरी अर्थात भावार्थ दिपिका होय! कोणताही ग्रंथ आणि त्याचा निर्माता कोण आहे? त्याचे चरित्र आणि चारित्र्य काय आहे? हे पाहणे अगत्याचे ठरते. लोखंड तापून लालबुंद झाल्याशिवाय त्याला आकार देता येत नाही. तापल्याशिवाय लोखंड वाकत नाही. त्यानंतर त्याला ठोकले जाते आणि मग हवा तो आकार त्याला प्राप्त होतो. तसेच झाले ज्ञानदेवांच्या बाबतीत! नाथपंथी असणारे ज्ञानदेवादी भावंडे वारकरी का झाली? याचे उत्तर ज्ञानदेवांनी त्यांच्या हरिपाठात अनेकवेळा दिले आहे. तेराव्या शतकांत धर्ममार्तंडांनी वर्णव्यवस्थेच्या भीती आणखी कडेकोट केल्या. त्यात खरे वेद आणि त्याचे ज्ञान सांगणाऱ्या लोकांना बहिष्कृत करण्याचे कारस्थान रचले गेले. वेद शास्त्र संपन्न श्री विठ्ठलपंत कुलकर्णी हे दशग्रंथी ब्राह्मण होते. कमी वयात संसारातून चित्त विटल्यामुळे त्यांनी संन्यास घेतला आणि पुन्हा गुरूं आज्ञेने संसारात परतले. त्यानंतर त्यांना चार अपत्ये झाली. हे पाप आहे असा ठपका पंतांवर तत्कालीन थोतांड धर्म रक्षकांनी ठेवला आणि पुढचा इतिहास सर्वश्रुत आहे. त्यानंतर जो प्रचंड त्रास या चारही भावंडांनी झेलला तो पण सर्वांना माहिती आहे. तावून सुलाखून जे चमकते त्यालाच सोने म्हणतात! याच न्यायाने प्रचंड छळ, वेदना, अवहेलना, प्रतारणा पचवल्या नंतर ज्ञानदेवांना जीवनातील अनमोल क्षणांचे आणि ज्ञानामृताचे कण वेचून सर्वसामान्य माणसांना अलौकिक ज्ञान मोकळे झाले.



कमी वयातच माणूस मोठी आव्हाने पेलू शकतो याचे जगातील सर्वोत्तम उदाहरण म्हणजे मराठी भाषेतील ज्ञानदेवांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी होय! जगात अनेक समीक्षाग्रंथ होऊन गेले आणि अनेक थोर-मोठे समीक्षकही होऊन गेले मात्र गीतेवरील सर्वांगसुंदर समीक्षा ग्रंथ म्हणजे एक नवा आनंदामृत ग्रंथ म्हणजेच श्री ज्ञानेश्वरी होय! गीतेच्या अठरा अध्याय, सातशे श्लोकांना ज्ञानदेवांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने नऊ हजार सर्वांगसुंदर ओव्यांनी श्रीमद् भगवतगीतेला नवा आयाम दिला आहे! सजविले आहे! एखाद्या व्यक्तीचा अधिकार काय असावा? त्याविषयी त्या व्यक्तींचे समकालीन लोक काय लिहितात? यावर त्या व्यक्तीच महत्ता ठरवता येते. संत नामदेवराय लिहितात,
ज्ञानदेवाचे बोल उघड निर्मळ । जान्हवीचें जळ स्थिर वाहे ॥
याला जोडूनच संत जनाबाई ज्ञानदेवांची महती सांगताना लिहितात,ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर॥
ज्ञानदेवांच्या प्रतिभेचा ठसा समकालीन संतांवर खोलवर उमटला होता. संत ज्ञानदेव तत्कालीन संत जनाबाई, संत नामदेवराय, संत चोखामेळा, संत सावतोबा महाराज, संत निवृत्ती महाराज यांच्यापेक्षा वयाने फार लहान होते मात्र कमी वयात ते अत्युच्च प्रतिभेचे धनी झाले होते. तरुण ज्ञानदेवांचे प्रतिभा सौंदर्य इतरांपेक्षा जरा जास्तच फुलले होते! यातूनच सर्व संतांनी ज्ञानदेवांचे श्रेष्ठत्व मान्य केले. त्यातच ज्ञानदेवांनी गीतेसारखा क्लिष्ट, कठीण संस्कृत ग्रंथ प्राकृत भाषेत मोठ्या गोड शब्दांनी अनुवादित करून ज्ञानेश्वरी सारखा नवनउन्मेषाची शालिनी प्रभा ग्रंथ निर्माण केला! कोणत्याही लेखकाची एखादीच कलाकृती ही त्याची सर्वश्रेष्ठ कलाकृती असते, त्याच न्यायाने संत ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी ही मराठीवाङ्मयालाज्ञानदेवांचे अत्युच्च देणे आहे! ज्ञानेश्वरी या ग्रंथाविषयी संत जनाबाई लिहितात,
ज्ञान होय अज्ञानासी । ऐसा वर त्या टीकेसी ॥
स्वयंप्रतिभेच्या धनी असलेल्या संत जनाबाई एका ग्रंथांविषयी असे लिहितात हे या ग्रंथाला मिळालेले सर्वोच पदक आहे. ज्ञानेश्वरी असा ग्रंथ आहे ज्याचे लक्षपूर्वक वाचन केल्यास जगातील अनंत बाबींचे ज्ञान झाल्याशिवाय राहणार नाही. अनेक विज्ञानातील शोध ज्ञानदेवांनी लिहिले आहेत. हा केवळ योगायोग, चमत्कार नसून एका योगी युवकाने आपल्या अलौकिक प्रतिभेने अनुभूतीपूर्ण विदित केलेले हे सर्वोच्च ज्ञान आहे!
अगोदरच गीता सर्वांना पथदर्शी झाली आहे. गीता ग्रंथाविषयी विनोबा भावे लिहितात, "आपले हे भाग्य आहे की येथे जेवढे धान्याचे पिक आले आहे त्यापेक्षा ज्ञानाचे पिक आले आहे. बारा-चौदा संपन्न भाषा इथे आहेत. जगाचा अध्यात्मिक साहित्याचा आरंभ ज्या ग्रंथापासून झाला तो ऋग्वेद, तो संस्कृतात आहे. इतक्या विचारांनी परिपूर्ण असलेल्या समाजात गीता आली." असा सर्वांना उपदेश करणारा महान ग्रंथ वयाच्या सोळाव्या वर्षी महान प्रतिभा लाभलेल्या ज्ञानदेवांनी आपली सर्वांगसुंदर शब्दांनी ललामभूत केला. ज्ञानेश्वरीत काय नाही? गीतेपेक्षाही अनेक नवनवीन बाबी ज्ञानदेवांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने सजवल्या आहेत. "तेथ प्रियाची परमसिमा। तो माऊली भेटे आत्मा॥" या ओविद्वारे ज्ञानदेवराय प्रेमाची मूर्ती बनून समर येतात. यासाठी विनोबाजी लिहितात, "आत्मा माऊली हा अगदी अद्वितीय शब्द प्रयोग आहे. हा एक शब्द ज्ञानदेवांच्या संपूर्ण जीवनाचा आणि विचारांचा दर्शक आहे. ज्ञानेश्वरी हा सर्वोच्च जीवन ग्रंथ आहे. सोळा वर्षे वयाच्या युवकाचा तो एक दुर्दम्य आशावाद आहे. आपल्याच लोकांनी जंगजंग पछाडल्या नंतर स्वतःतील अद्भुत सामर्थ्य प्रकट झाले! जगात कमी वयाच्या लोकांनीच क्रांती घडवून आणल्या आहेत. त्यातील ज्ञानदेवांची ही सर्वोच्च वाङ्मयीन क्रांती आहे. भ्रमर ज्याप्रमाणे फुलाफुलावरून मकरंदाने मधाचे पोळे शिगोशिग भरतो, त्याप्रमाणे मृदू-मधुर रसांनी ज्ञानेश्वरी ओतप्रोत ओसंडून वाहते आहे. इथे साहित्य सोनियाच्या खाणी असून ज्याला जो अलंकार घ्यायचा आहे तो उपलब्ध आहे. सर्व रस, गंध आणि रंग या ग्रंथात खळाळ वाहताहेत. जो जे वांच्छील तो ते लाहो! ज्याला जे पाहिजे ते त्याने येथून घ्यावे, तरीही या ज्ञानाच्या नदीतील प्रवाह खंडित होत नाही! असा अलौकिक ग्रंथ तरुणांनी नक्कीच वाचून आपल्या जीवनाचे सार्थक करून घ्यावे! कविता, कथा, नाटक, निबंध लिहायला आणि मृदू-मधुर बोलायला शिकवणारा एकमेवाद्वितीय ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी! प्रत्येक मराठी माणसाने हा सर्वांग सुंदर ग्रंथ वाचून निरोगी, आनंदी, ताणताणाव रहित जीवन जगावे! असे झाल्यास खऱ्या अर्थाने ज्ञानदेवांच्या कष्टाचे चीज झाले असे म्हणता येईल! माऊली की जय!

# कालबाह्य होत चाललेले लोकनाट्य : तमाशा



प्रा. बरसमवाड विठ्ठल
ता .मुखेड जि. नांदेड

आधुनिक केसरी

**मराठीतील लोकनाट्यलाच तमाशा असे म्हणतात. तमाशा या लोककलेला सध्या उतरती कळा लागली आहे. अनेक फड आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत; ते जिवंत राहिले पाहिजेत, यासाठी प्रसार माध्यमे व दूरदर्शन वरून नावाजलेल्या तमाशातील वगनाट्य दाखवावे म्हणजे येणाऱ्या पिढीला त्याची माहिती होईल व त्याचे जतन व संवर्धन होईल त्यासाठीच हा लेखन प्रपंच. मराठीतील गाजलेली लोककला तमाशा यांना नाटका सारखी किंवा एखाद्या- चित्रपटा सारखी प्रतिष्ठा मिळत नाही. नेहमी तमाशातील कलाकारांना अप्रतिष्ठेचाच सामना करावा लागतो. मनोरंजनासाठी काही वापरलेले अश्लील विनोद असल्यामुळे कलाकाराकडे त्यांच्या खाजगी जीवना मध्ये ही त्याच नजरेतून पाहिले जाते. मात्र प्रत्यक्ष जीवन हे कलाकारांचे संस्कारित असते.**

तमाशातील कलाकाराचे अनुकरण करता येत नाही काय?' तमासगिरा सारखा वागतो' असे म्हणून हेटाळणी केली जाते, प्रामुख्याने महिला कलाकारांना तर समाजात म्हणावी तशी प्रतिष्ठा मिळत नाही. काही पैसेवाल्यांच्या नजरेमध्ये या महिला योग्य नसतात, त्यांच्या कलेवर प्रेम करण्यापेक्षा देहावर प्रेम करून आपली भूक भागवावी असे अनेकांना वाटते तमासगिराचे तंबू ( राहुट्या ) नेहमी उघड्यावरच असतात. तिथे सगळे कलाकार एकत्रित येऊन राहतात. तिथे सुद्धा त्यांना राहण्याची, खाण्याची ,पिण्याची म्हणावी तशी सोय नसते. म्हणून उघड्या आभाळा खाली धरतीवर राहून प्रसंगी ऊन पाऊस, वारा, वादळ या सर्वांचा सामना करून हे कलाकार जीवनाचा गाडा हाकतात, हे सर्व जीवन त्यांचं अप्रतिष्ठेचं; काही काळापुरते मानसन्मान मिळाला तरी आजीवन अब्रू गेलेली असते; हे वास्तविक सत्य आहे, तमाशातील कलाकारांचे जीवन म्हणजे झोपाळ्यावरील झोके नसून सागरातील भरकटलेली होडी आहे असे एका ठिकाणी म्हटले आहे, व्यक्तीच्या जीवनामध्ये मनोरंजनाला फार महत्त्व आहे, जीवन जगताना व्यक्तीला मानसिक ताण- तणाव येतात हे ताणतणाव कमी करण्यासाठी मानवाला आनंद हवा असतो, म्हणूनच जगण्याचा अर्थ शोधण्यासाठी माणूस जे काही करतो तिलाच संस्कृती म्हणतात, ही संस्कृती लोककला मधून साकार होते, लोककला ही लोकांच्या जीवनाशी बांधील असते. तमाशा ही महाराष्ट्राची अशीच एक जुनी लोककला आहे ही लोककला कुठे उगम पावली आणि कुठपर्यंत चालत आली हे आपल्याला या लेखातून अभ्यासायचे आहे. तमाशामध्ये सांस्कृतिक परंपरा, अंधश्रद्धा ,रुढी कथा, नृत्य, गायन, रंजक कल्पना या सर्व घेतल्या जातात. तमाशा ही लोककला लोकांमध्ये अधिक लोकप्रिय झाली. तमाशा मराठी लोकजीवनाला अधिकच भावला, विधी नाट्य मध्ये काही लोकधर्म विशेष स्वीकारून तमाशा आकारास आला ,मग तमाशा तो सामाजिक ,राजकीय ,धार्मिक ऐतिहासिक ,कौटुंबिक कोणत्याही रूपात वगासारख्या कथनांकातून पाहायला व ऐकायला मिळतो. तमाशा मध्ये सुरुवातीला गणेशाची आराधना करून तमाशा सुरू केला जातो; नंतर गवळण होते त्यानंतर लावण्या सादर केल्या जातात आणि बतावणी सवाल- जवाब आणि शेवटी वगाने तमाशा समाप्त होत असतो, महाराष्ट्राची भूमी कृषीप्रधान आहे. सर्व शेतकरी, मजूर,कामगार वर्षभर शेतात कष्ट करतात. राबराब राबतात,कष्ट करून झाल्यावर मिळालेला फावला वेळ घालवण्यासाठी ते तमाशाकडे वळतात, तमाशा हा त्यांच्या जगण्याचा एक भाग आहे, तमाशा ही बहुजनाची सर्वात लोकप्रिय लोककला ठरली आहे. मराठी माणसाला मराठी मनाला मोहिनी घालणाऱ्या या मराठमोळ्या तमाशाने अनेक जणांच्या जीवनात आनंद निर्माण केलेला आहे, तमाशा हा एक रंजन प्रकार आहे; तो किती वर्षाखाली चालू झाला आहे, निश्चित सांगता येत नाही, तमाशाचा उगम पर्शियन देशात झाला असं काही व्यक्तीकडून म्हटलं जाते, डॉ. प्रभाकर मांडे यांच्या सादरीकरणातून तमाशा हा फारशी शब्द असून मुस्लिमाबरोबर तो महाराष्ट्रात आला असे त्यांचे मत आहे. तमाशाच्या गाडीचे एक चाक शृंगाराचे आणि दुसरे ब्रह्मज्ञानाचे होते या दोन्ही चाकांना जोडणारा कणा शूरवीरांच्या पराक्रमाचा होता असे मत मा,नामदेव व्हटकर म्हणतात ,इसवी सनाच्या पहिल्या शतकात सातवाहन वंशातील हाल नावाच्या राजाने नाट्य व काव्य यांना उत्तेजन देऊन राजाश्रय दिला होता असा उल्लेख गाथा सप्तशतीतआहे. सतराव्या शतका पासून महाराष्ट्रामध्ये तमाशा हा अतिशय लोकप्रिय असणारा कलाप्रकार आहे. हा कलाप्रकार सिद्ध होण्यापूर्वी महाराष्ट्रात गीत, गायन वाघ्या, मुरळी, जागरण गोंधळ, दशावतार, बहुरूपी वासुदेवाची गाणी, पोतराज इत्यादी लोककला प्रकार प्रचलित होते. महाराष्ट्रात कळसुत्री बाहुल्यांचे खेळ. दशावताराचे खेळ. सोंग केलेले खेळ, कसरतीचे खेळ हे प्रकार अगोदर पासूनच रूढ होते. तमाशा हा शब्द विनोद, नृत्य, गायन,गण, गवळण ,बतावणी आणि वग यांनी युक्त असलेल्या लोकनाट्याचा एक अविष्कार आहे. तमाशाचे खेळ हे अनेक गावांमध्ये भरणाऱ्या जत्रेत, यात्रेत, उरूस, निवडणूकीत, अशा विशेष प्रसंगी उघड्यावर किंवा तंबूत होत असतात.तमाशा हा लोककला परंपरेतील कलाविष्काराची तंत्रे स्वीकारली असली तरी विधीनाट्याचा मूळ आकृतीबंध मात्र कायम ठेवला आहे, महाराष्ट्रातील तमाशा कलावंताच्या संचाला फड म्हणतात, संत एकनाथ महाराजांच्या एका भारुडात' बडे बडे तमाशा देखे' अशी ओळ आहे. तमाशा या शब्दाचा अर्थ उघडा देखावा असा आहे. तमाशा या शब्दाची फोड करून तम + आशा = तमातून म्हणजेच अंधारातून आशेचा प्रकाश दाखविणारा असा होतो,समाजातील प्रतिष्ठित वर्गात तमाशा हा हिणकस लोकांचा आचरट कलाप्रकार अशी समजूत रूढ झाली आहे. सुप्रसिद्ध कवी पठ्ठे बापूराव यांनी म्हटले लवकर यावे सिद्ध गणेशा। आत मध्ये कीर्तन वरून तमाशा।। भक्ती व श्रृंगार या दोघांचा संयोगातून तमाशाचा जन्म झाला आहे.



तमाशात, पार्टी प्रमुख, सरदार, शाहीर, पोस्टर करणारे पेंटर, हलगीवाले, ढोलकी वादक, नाच्या, दहा - बारा नृत्यांगना, गायिका, लावण्या लिहिणारे गीतकार, वगनाट्य लेखक, हार्मोनियम वादक तबलावादक, धिमडी -तुणतुणे मंजिरी झिलकरी, सोंगाड्या (मावशी) इत्यादी लोकांचा समावेश असतो. महाराष्ट्रातील लोकप्रिय कलाप्रकार लोकशाहीर बशीर मोमीन कवठेकर यांनी लावण्या, लोकगीते, सवाल- जवाब, गणगवळण आणि फार्स असे विविधांगी साहित्य निर्माण करून अनेक तमाशा मंडळाला पुरविले आहे, अलीकडच्या काळात महाराष्ट्रामध्ये शाहीर रघुवीर खेडकर, मंगला बनसोडे, काळू बाळू,चंद्रकांत ढवळपुरीकर, भिका भीमा, विठाबाई नारायण गावकर, मालती इनामदार, दत्ता महाडिक पुणेकर, अंजली राजे नाशिककर, आम्रपाली पुणेकर, दिपाली पुणेकर, संध्या माने असे अनेक गाजलेल्या नामवंत फडाची नावे सांगता येतात, नारायणगाव हे तमाशाचे प्रमुख केंद्र आहे. काही नावाजलेले तमासगीर संपूर्ण महाराष्ट्राला पोट धरून खदाखदा हसून आपली ही जिवंत कला लोकांसमोर सादर करतात. जहरी प्याला, रक्तात भिजली हिरवी साडी ,शेराला भेटला सव्वाशेर, सख्खा भाऊ पक्का वैरी असे वग सादर करून लोकांमध्ये परिवर्तन ,नाविन्यपूर्ण आणि गंभीरपणे विचार करायला लावणारे लोकनाट्य सादर केले जातात, शेतामध्ये काम करून शिणून गेलेल्या शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना,कामगारांना एखादा तमाशा पाहिल्यानंतर नव संजीवनी मिळते, त्यातूनच एखादा वग आवडल्यास प्रेरणाही मिळते म्हणून तमाशा ही जिवंत कला आहे ती जिवंतच राहिली पाहिजे; म्हणून भाऊ फक्कड ,शाहीर परसराम, शाहीर होनाजी बाळा, शाहीर हैबती घाटगे शाहीर राम जोशी, सगनभाऊ ,आनंद फंदी ,कवी पठ्ठे बापूराव यांनी तमाशा रंगभूमीला चांगले योगदान दिले आहे. अलीकडच्या काळामध्ये तमाशाला अनेक समस्या निर्माण होत आहेत. शासनाने या तमाशा कलावंतांना जास्तीत जास्त मानधन द्यावे, शासनाकडून दरवर्षी तमाशा या कलेचा गौरव व्हावा म्हणून भरीव कार्य केलेल्या कलाकारास विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते पाच लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. लोककला परंपरेनुसार उत्सवामध्ये, जत्रेत ,उरूसामध्ये दाखविण्यासाठी सहकार्य करावे ,कलावंतांच्या मुलांच्या शिक्षणाची समस्या फारच गंभीर आहे. कारण ही कला साजरी करण्यासाठी कलावंतांना गावोगावी जावे लागते; तेव्हा या कलाकारांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी समस्या निर्माण होतात. म्हणून तमासगीराच्या जीवनाचे अवघड झालेले आहे, कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ, भूकंप, पूर, यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे तमाशा वर वाईट परिणाम होतात. कोरोनामुळे अनेक कलाकारांचे हाल झाले हे सगळ्यांना ज्ञात आहे. शासनाकडून अल्प प्रमाणात निधी दिला जातो, वार्धक्यात निवृत्ती वेतन व मानधन योजना बरेच वर्ष नव्हती, आता थोड्या प्रमाणात कलेसाठी मानधन मिळत आहे. ही कला प्रेक्षकांना दाखविण्यासाठी तंबू , राहुट्या कणात, स्टेज, अवघड साहित्याची वाहतूक करावी लागते. कलाकारांना पैसे द्यावे लागतात. प्रेक्षकाकडून म्हणावे तसे पैसे जमा होत नाहीत. अशा अनेक समस्या या फड मालकांकडे आहेत. या कलाकाराच्या वाट्याला अप्रतिष्ठेचे जीवन येते. कधीकधी नाव प्रतिष्ठा, पैसा, मान सन्मान मिळतो परंतु समाजामध्ये यांच्या अब्रूची लक्तरे तोडले जातात. जसे दसऱ्याच्या वेळेस आपट्याच्या पानाला सोनं सोनं म्हणतात. दुसऱ्या दिवशी तेच पायदळी तुडवतात अशी अवस्था या कलाकाराची झालेली आहे जोपर्यंत अंगात रग ( शक्ती ) आहे तोपर्यंत महिलेच्या पायातले चाळ (घुंगरू) छूम छूम छूम वाजतात. तोपर्यंत सर्व काही आपोआप मिळते, एक बार वार्धक्याकडे झुकल्यानंतर समाज त्यांच्या कडे दुर्लक्ष करतो. हिणकस दृष्टीकोनातून पाहतो. म्हणून असे न होता एकंदरीत या कलेची प्रतिष्ठा सदैव जपली जावी. पूर्वीच्या काळी तमाशा पहाटेपर्यंत चालत असत, पण आता शासनाच्या परिपत्रकानुसार रात्री बाराच्या आत संपवावा लागतो त्यामुळे वगातील कथानक सादरीकरण काही राहून जाते ही फार मोठी समस्या सध्या निर्माण झाली आहे .या लोककलेपुढे अनेक समस्या असल्या तरी ही कला लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारी जिवंत कला आहे ते सदैव चालू असली पाहिजे; त्यासाठी शासन आणि समाजाने या लोककले कडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे, सध्या मालिका मधून सुद्धा काही अश्लिल , दोन अर्थाचे शब्द बोलले जातात ;परंतु समाज तिकडे दुर्लक्ष करतो आणि तमाशा म्हटलं की नाक मुरडतो हे मला योग्य वाटत नाही, सध्या छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत 4 ऑक्टो ते 7 ऑक्टो दरम्यान लोककलेचे संवर्धन करणारा युवा महोत्सव हा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, ग्रामीण भागातील विद्यार्थी देशपातळीवर झळकावेत, जात, धर्म, वंश, लिंग यात भेदाभेद न करता सर्वजण आपण एक आहोत हे समजून युवक महोत्सव साजरा करीत आहेत या उत्सवांमधून सुद्धा लोककलेला उत्तेजन दिले जावे, त्याचबरोबर कलाकारांनाही जास्तीत जास्त मान -सन्मान मिळवून द्यावे हीच अपेक्षा.

# गडकिल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता काळाची गरज : नितीन मोहिते

आधुनिक केसरी न्यूज



**पिलीव :** आपल्या महाराष्ट्राचा बहुतांश इतिहास पुस्तकांमध्येच दिसून येतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा बहुतांश इतिहास आज आपल्या डोळ्यासमोर उभा आहे तो इतिहास जपण्यासाठी आज अनेक हात झटत आहेत गरज आहे त्यांच्या हाताला हात लावायची कारण नव्या पिढीसाठी फक्त स्वाभिमान, अभिमान याच गोष्टी नाही ठेवायच्या त्या पुस्तकात पण राहू शकतात. परंतु बांधकाम शास्त्राची उत्कृष्ट नमुना असणारे किल्ले, शत्रूसाठी उभारलेल्या चकव्या वाटा, डोंगराच्या अवघड ठिकाणी बांधलेल्या किल्ल्यातून छत्रपती शिवरायांची दिसणारी दूरदृष्टी, मावळ्यांची ताकद,राज्यकारभाराची किल्ल्यावर केलेली व्यवस्था या सर्व गोष्टी नवीन पिढींना याची देही याची डोळा पहाव्यात यासाठी गडकिल्ले संवर्धन ही काळाची गरज असल्याचे माळशिरस तालुक्यातील पिलीव गावचे लोकनियुक्त सरपंच नितीन मोहिते-माळी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.गड किल्ले संवर्धन व स्वच्छता या मोहिमेंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अकलूज, खंडाळी येथील शिक्षक व विद्यार्थी पिलीव येथील किल्ल्याची स्वच्छता करण्यासाठी आली होते त्या ठिकाणी सरपंच नितीन मोहिते-माळी बोलत होते. यावेळी ॲड.मानसिंह जागीरदार, माजी उपसरपंच संजय आर्वे, चंद्रकांत माळी, दादा देशमुख, सुषमा जामदार, ज्योती फाळके यांनीही गडकिल्ले संवर्धन व स्वच्छता या मोहिमेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांना स्वच्छता करण्यासाठी हातभार लावला यावेळी प्राचार्य डी.वाय. ओंबासे, एल.वाय. बिराजदार, एन.एम शिंदे यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संपूर्ण पावसाळ्यात एकच पूर; गिरीजा मध्यम प्रकल्पात चोवीस टक्केच पाणीसाठा शिल्लक

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे येसगाव येथील गिरीजा मध्यम प्रकल्पात वर्ष-२०२३-२४ पुर्ण पावसाळ्यात आतापर्यंत एकच पुरपाणी आले असून २४%टक्के पाणी साठा शिल्लक आहे. वर्ष २०२३-२४ आतापर्यंत पावसाळ्यात आतापर्यंत एकच पुर पाणी आल्याने २४% पाणीसाठा उपलब्ध आहे. पुढे भविष्यात परतीचा पावसावर प्रकल्पांचे पाण्यासाठा किंवा भरण्याचे भिस्त आहे. जवळपास पावसाळा संपत आला असून यंदा जेमतेम पाऊस झाला व त्यांजेमतेम पावसावरच खरिप पिक हंगामाची दारोमदार आहे. तर २४% पाण्या साठ्या वरच आठ महिने खुलताबाद शहर व ग्रामीण नागरिकांचे कसे जाणार याची चिंता नागरिकांतून व्यक्त होत आहे. गतवर्षी परतीच्या पावसाने पाणीच पाणी केले होते यंदा तिच स्थिती राहिली तर मध्यम प्रकल्प भरण्यास वेळ लागणार नाही. पण पूर्ण पावसाळ्यात जेमतेम पावसामुळे नदी नाल्यांना पुरपाणी आले नाही. तर परतच्या पावसाची हमी नाही त्यामुळे २४%पाणी साठ्यावरच तहान भागवने आहे, अशी प्रतिक्रिया नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहे.

# मोलखेडा येथे महात्मा गांधींना अभिवादन व श्रमदानातून दिला 'स्वच्छतेचा मंत्र'

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी श्रमदानातून दिला "स्वच्छतेचा मंत्र" दि.२/१०/२३ ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रपीता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सौ.मनिषातीई ज्ञानेश्वर वारंगणे व ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पनेतून देशात १ ऑक्टोबर रविवार रोजी जेष्ठ नागरिक रामभाऊ वारंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली 'एक तारीख एक तास' हा श्रमदानाचा उपक्रम राबविण्यात आला असून सोयगाव तालुक्यात प्रत्येक गावामध्ये सकाळी १० वाजेता एकाचवेळी श्रमदान मोहिम करण्यात आली. येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे सदस्य, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, यांनी या अभियानात सहभागी होऊन आपल्या मोलखेडा गावाच्या स्वच्छतेसाठी योगदान दिल्याचे पाहायला मिळाले.मोलखेडा येथील सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, उपसरपंच व अतुल इंगळे ग्रामपंचायत सदस्य व सर्व सदस्य, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी हातात झाडू घेऊन शाळा व शाळेतील परिसर स्वच्छ केला. विद्यार्थ्यांकडून यावेळी हातात फलक घेऊन जनजागृतीपर संदेशही देण्यात आले. यावेळी महात्मा गांधीजींना सामूहिक 'स्वच्छांजली' अर्पण केली. यावेळी मोलखेडा ग्रामपंचायत येथे देशाचे कर्तव्यतत्पर पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या आवाहनानुसार सरपंचपती ज्ञानेश्वर वारंगणे यांनी "एक तारीख, एक तास, एक साथ" या उपक्रमाअंतर्गत मोलखेडा स्वच्छता अभियानात सहभागी होऊन ग्रा.पं. कार्यालय व सभोवताच्या परिसर श्रमदानातून स्वच्छ करण्यात आले. याप्रसंगी सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम, उपसरपंच गुलाबसिंग राणा, जेष्ठ नागरिक रामभाऊ वारंगणे, अतुल इंगळे, सरपंचपती ज्ञानेश्वर वारंगणे,शालेय समितीचे अध्यक्ष राजू सुपडा वारांगणे, रवींद्र गायकवाड, अनंता गायकवाड, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशाताई सेविका, डॉ. सोमासे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षकवृंद, शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झोले होते.



# ओबीसी समन्वय समितीतर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधी लालबहादूर शास्त्री जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे लाडके पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त ओबीसी समन्वय समिती, संत तुकाराम युवा आघाडी, पर्यावरण वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने सकाळी महात्मा गांधी पुतळ्याजवळ राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला माल्या अर्पण करण्यात आले. तसेच स्वच्छता अभियाना अंतर्गत वर्धा नदीच्या विसर्जन घाट येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले त्यानंतर कारवा रोड जंगला जंगत्यानंतर कारवा रोड जंगल परिसरात मध्ये विविधपरीत विविध प्रकारच्या पन्नास रोपट्याचे रोपण करण्यात आले तसेच नंतर यूपीएससी एमपीएससी च्या स्पर्धा परीक्षा करिता लागणाऱ्या विविध शैक्षणिक पुस्तकाची भेट डॉक्टर रजनीताई हजारे सार्वजनिक वाचल्याांना पुस्तके भेट देण्यात आली स्तुत्य उपक्रमाकरिता उपस्थितचे अभिनंदन केले. यावेळी पर्यावरण वाहिनीचे अध्यक्ष मोहम्मद शरीफ प्राध्यापक अनिल वागदरकर पियू जरीले ओबीसी समन्वय समिती अध्यक्ष विवेक खुटेमाटे आदींनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. पर्यावरण रक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे लावावे आव्हान मोहम्मद शरीफ सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सर्वश्री विवेक खुटेमाटे, सुधीर कोरडे, सुनिल भटारकर, सुधीर कोरडे, कैशव थिपे, भास्कर वडस्कर, अमोल काकडे, वंसत खेडकर, शुभागी तीडके, अफसाना परवीन सय्यद, शंकर काळे, ऊमेश कडू, राजेश मारपल्लीवार,मंगेश भुत्ते, गजानन ऊमरे, गणपती मोरे, स्वामी रायबरम, हेमत चीताडे,पाडू गोदे,अजयपाल सुयवशी,बाहादे सर,प्रकाश नरसीगोज आदिनी प्रयत्न केले.

# वंचित युवा आघाडी अध्यक्षपदी चूनारकर

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर व डॉ. निलेश विश्वकर्मा, अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश युवा आघाडी यांच्या आदशाप्रमाणे बल्लारपूर तालुका कार्यकारणी साठी वंचित बहुजन युवा आघाडीच्या कार्यकारणी आदेश द्वारे घोषणा करण्यात आली असून तालुका युवा आघाडीच्या अध्यक्ष पदी अभिलाष चूनारकर यांची तर महासचिव पदी गौतम रामटेके यांची नियुक्ती करण्यात आले आहे.

तसेच उपाध्यक्षपदी आचल लाकडे, आरती अलोणे व सदस्य मयूर वानखेडे यांची न्युक्ती केली आहे. वंचित बहुजन आघाडी चा संघटात्मक बाधनी तसेच पक्ष वाढीचा उद्देशाने जबाबदारी देयात आले आहे. पदाचा उपयोग करून पक्षाला नव्या उंचीवर नेण्यासाठी कठीबध राहणार, असे तालुका वंचित बहुजन युवा आघाडी चे नवनियुक्त अध्यक्ष अभिलाष चूनारकर यांनी म्हटले.


हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# महात्मा गांधी आहिसेचे पुजारी, त्यांचे विचार घराघरात पोहोचवा : प्रकाश धुमाळ

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** लोणार तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या दि. 2 ऑक्टोंबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती आज सकाळी 10 वाजता हॉटेल अथर्व रेस्टॉरंट येथे तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी व शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद यांनी कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. दोघांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महात्मा गांधी आहिसेचे पुजारी होते त्यांच्या विचार तरुण पिढीपर्यंत पोहोचण्याचे काम काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केले पाहिजे प्रकाश धुमाळ यांनी केले. यावेळी बोलताना सांगितले कीआहिसेचे पुजारी महात्मा गांधी यांनी या देशाला स्वतंत्र मिळवून देण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने आंदोलन केले ऐसा सत्याग्रह करून स्वतंत्र मिळालेल्या भारत हा जगातील एकमेव देश आहे महात्मा गांधी यांच्या त्याग काँग्रेस पक्षाने त्यांच्या नेतृत्वात केलेल्या सत्याग्रहाणने देशाला गुलामगिरीतून मुक्त केले त्यांच्या विचार तरुण पिढीस रुजवणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी कोषाध्यक्ष शांतीलालजी गुगलीया, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते साहेबराव पाटोळे, गटनेते भूषण मापारी, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तोफिक कुरेशी, माजी नगरसेवक शेख करामत शेख गुलाब, माजी नगरसेवक पंढरी चाटे, युवक काँग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे, शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष कृष्णा बाजाड, दौलत मानकर, संजय गांधी निराधार योजनेचे माजी सदस्य शेख सज्जाद शेख करामत, उपस्थित होते. यावेळी बोलताना धुमाळ सांगितले की नोटंकी करणारे केंद्र सरकार महात्मा गांधींना अभिवादन करण्याचे नाटक करून त्यांच्या मारेकऱ्यांचा समर्थन करतात पण गांधीजी म्हणजे विचाराची आहिसेची चळवळ तो संपविणे त्यांच्या हातात नाही. परंतु नवी नवी पिढीसमोर महात्मा गांधीचा इतिहास चुकीच्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न हाणून पाडला पाहिजे व महात्मा गांधी यांचे विचार तरुण पिढीपर्यंत व घराघरात पोहोचविण्याचे काम काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांनी करावे, असे प्रकाश धुमाळ यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अनिकेत मापारी, सूत्रसंचालन प्राध्यापक गजानन खरात, आभार शेख समद शेख अहमद यांनी केले.

# तरडगावच्या माऊली सेवा दलाचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** तरडगाव, ता.फलटण येथील माऊली विचार मंच यांचे माऊली सेवा दलाने पंढरपूरच्या विठ्ठल मंदिर येथे स्वच्छता मोहीम राबविली होती. तरडगावच्या माऊलींनी विठ्ठलाच्या दारी सेवा केल्याने या सेवेबद्दल माऊली सेवा दलाचे विशेष कौतूक होऊ लागले आहे. तरडगाव येथील अजिंक्य गणेश उत्सव मंडळ (शिवाजीनगर) यांच्या वतीने फलटण-कोरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार दीपक चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माऊली सेवा दलाचे मार्गदर्शक शिवाजी मानसिंग गायकवाड, सतिश ज्ञानोबा गायकवाड, मुरलीधर बापूजी गायकवाड, रमेश गणपत गायकवाड, दिलीप भगवान धुमाळ,अध्यक्ष शिवाजी विनायक गायकवाड, उपाध्यक्ष शिवाजी लक्ष्मण गायकवाड, सचिव विक्रम शंकर गाडे,कार्यवाहक अमोल दामोदर गायकवाड, सचिन तुकाराम बावकर, विकास बाळकृष्ण गायकवाड तसेच सेवा दलाचे पदाधिकारी उमेश खुडे, चंद्रकांत नलवडे, विकास खंडागळे, अंकूश गोडसे, अजित गायकवाड, शरद गायकवाड, शेखर अडसूळ, सतीश गायकवाड, सुशिल गायकवाड, सचिन गायकवाड, प्रशांत गायकवाड, परमेश्वर गायकवाड, रघुनाथ अडसूळ, दत्तात्रय गायकवाड आदी उपस्थित होते. आमदार दीपक चव्हाण यांनी माऊली सेवा दलाच्या वतीने चाललेल्या स्वच्छता मोहीम कार्याबद्दल विशेष कौतुक केले.

# वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बारा वर्षांपूर्वीचा जो जीआर आहे शासनाचा की गायरान व इतर जमिनीवरील अतिक्रमण नष्ट करण्यात यावे परंतु काही दिवसांपूर्वी आम्ही मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असता त्यांनी विषयासंदर्भात चर्चा करीत सांगितले की नवीन जीआर काढला की गायरान जमिनीवरील गोरगरिबांचे अतिक्रमण हटवले जाणार नाही परंतु व्यवसायिक अतिक्रमण शंभर टक्के पाडण्यात येईल. आम्हाला आश्वासन देऊन देखील कित्येक दिवस उलटून आतापर्यंत कुठलेही अतिक्रमणावर कारवाई झाली नाही असा आरोपही ही निवेदनात  करण्यात आला. आम्ही शासनाच्या निदर्शनात देखील आणले असून साक्री तालुक्यातील अंबापूर ग्रामपंचायत मध्ये गायरान 80/2 मधील कृष्णा गार्डन नावाच्या हॉटेलवर अतिक्रमण असून तेथील जागेच्या मेंढपाळ मेंढ्या चारण्यासाठी गेले असता त्यांना मारहाण होत असते त्यासंदर्भात देखील आम्ही निवेदनाद्वारे कारवाईसाठी जिल्हाधिकारी यांना विनंती केली आहे, असे या ठिकाणी सांगण्यात आले आहे.

# महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथे ग्रुप ग्रामपंचायत सुलतानपूर- भांडेगाव यांच्या वतीने सोमवार दि.२ रोजी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी  सरपंच अमरनाथ श्रीखंडे, आसिफ शेख, प्रकाश चव्हाण, विष्णू चव्हाण, अंबादास चव्हाण चंपालाल जसोरिया राष्ट्रवादी युवक जिल्हा सरचिटणीस वैभव चव्हाण, गणेश  चव्हाण, प्रशांत वेताळ, पूनमचंद शीरभैये ग्रा.पं. शिपाई बाबासाहेब मालोदे, ततेराव कोतकर, आप्पासाहेब चव्हाण आदींची उपस्थिती होती.

# फुलंब्री कृषी बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील कृषी बाजार समितीचे दिनांक 30 तारखेला बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा मा. सभापती सौ. अनुराधा अतुल चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली सभेची सुरुवात दीप प्रज्वलन करून श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येऊन त्यानंतर स्वर्गीय डॉ. एम. एस. स्वामिनाथन व कृषी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच इतर क्षेत्रात कार्य करणारे ज्ञात अज्ञात व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ करणाऱ्या व्यापारी बांधवांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मा. अध्यक्षांचे मान्यतेने बाजार समितीचे सचिव एम. एम. गोरे यांनी विषय पत्रिकेनुसार सभेचे कामकाज पूर्ण केले. या प्रसंगी सभेस उपस्थित सदस्याकडून बाजार समितीचे आवारात लिलाव, भाजीपाला मार्केट चालू करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली त्यावर मा. सभापती अनुराधाताई चव्हाण व मा. उपसभापती दत्तात्रय करपे यांनी लवकरात लवकर आपल्या सूचना व मागण्या पूर्ण करण्यात येतील असे आश्वसन देण्यात आले. यावेळी मा. संचालक तथा जिल्हा अध्यक्ष सुहास सिरसाट, आप्पासाहेब काकडे, वरून पाथ्रीकर, अजहर सय्यद, श्रीराम म्हस्के,  जगन्नाथ दाढे, माजी सभापती सर्जेराव मेटे ,विवेक चव्हाण यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर मा. सभापती यांनी अध्यक्षीय समारोपात बाजार समितीच्या पुढील योजना व वाटचाली बद्दल मनोगत व्यक्त केले. सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व्यापारी, हमाल प्रतिनिधी तसेच कार्यक्षेत्रातील शेतकरी व बाजार समितीचे मा. संचालक शिवाजीराव पाथ्रीकर, साविताताई फुके, योगेश जाधव, जितेंद्र जैस्वाल, रोषण अवसरमल तसेच भा.ज.पा. तालुकाध्यक्ष सांडू अण्णा जाधव, योगेश मिसाळ, इलियास शहा शिवराम म्हस्के संतोष तांदळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सभेचे सूत्रसंचालन सूचित बोरसे यांनी केले व संचालक माधवराव जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.




# आ.सतीश चव्हाण यांच्या विकास निधीतून बांधलेल्या सभागृहाची कामाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील किनगाव दि. 3.10.23 मंगळवार रोजी येथील संत गाडगेबाबा यांच्या स्मारकाच्या सभामंडपाच्या कामाची पाहणी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष नितीन देशमुख साहेब यांनी केली. या कामासाठी पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश भाऊ चव्हाण यांच्या स्थानिक विकास निधीतून सुमारे पाच लाख रुपये खर्च करून बांधलेल्या सभागृहाच्या कामाची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले तसेच उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले. यावेळी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष बाबासाहेब तांदळे रमेश चव्हाण माजी सभापती विवेक चव्हाण अनिल चव्हाण सुभाष चव्हाण विलासराव चव्हाण पद्माकर तावडे सुधाकर तावडे आदी मान्यवर उपस्थित होते या वेळी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी सभागृहाच्या कामाची माहिती दिली व आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. त्या नंतर किनगांव येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली असता शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या व शाळेच्या मुख्याध्यापक श्री महेंद्र कुंवर यांनी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष नितीन देशमुख साहेब यांचे स्वागत केले.

# खामगाव गोरक्ष तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी गंगाधर सोनवणे बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील ग्रामपंचायत खामगाव गोरक्ष येथे सरपंच सोनवणे यांचे अध्यक्षते ग्रामसभा नुकतीच संपन्न झाली. या ग्रामसभेत तंटामुक्त समितीची स्थापना करण्यात आली, या मध्ये तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी गंगाधर संपतराव सोनवणे यांची एकमताने निवड करण्यात आली.  उमराव सोनवणे उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी सरपंच सोमिनाथ पा. सोनवणे, जगन्नाथ पा सोनवणे, निलेश सोनवणे, भगवता सोनवणे, भगवान म्हस्के, शिवाजी चव्हाण, सुभाष पवार, साईनाथ सोनवणे ,फईन शेख व समस्त गावकरी मंडळी यांनी निवडी बदल अभिनंदन केले. यावेळी एक माहितगार, अभ्यासु कला प्रेमी अध्यक्ष लाभल्यामुळे सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे. आपले मत व्यक्त करताणा अध्यक्ष म्हणाले शांततेकडुन समृध्दीकडे सर्वांनासोबत घेऊन गावातील तंटे गाव पातळीवर सामंजस्याने मिटविण्यावर भर देणार व गावात शांतता व एकता अबाधित ठेवणार असल्याचे गंगाधर सोनवणे यांनी सांगितले.



# ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडेंच्या मदतीसाठी समर्थक सरसावले

## आदेश आल्यास जालन्यातून लाखोंची मदत देणार : सचिन ढाकणे

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**जालना :** भाजपचे ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांचा वैद्यनाथ साखर कारखाना आर्थिक अडचणीत सापडला असून यातून बाहेर येण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न चालू आहेत. परंतु अशातच जीएसटी विभागाने 19 कोटी रुपयांचा कर भरल्या नाही म्हणून कारखान्यास नोटीस पाठवून जप्तीचे आदेश काढला आहे. त्यामुळे पंकजा मुंडेंच्या अडचणीत अधिकच भर पडली आहे. अशा बिकट परिस्थितीत जालना जिल्ह्यातील समर्थक पंकजा मुंडे यांच्या मदतीसाठी पुढे सरसावले आहेत. आम्ही फक्त ताईंच्या आदेशाची वाट पाहत आहोत. ताईने आदेश दिल्यास जालना जिल्ह्यातून लाखोंची मदत देणार असल्याचे दसरा कृती समितीचे अध्यक्ष सचिन ढाकणे यांनी सांगितले. पंकजा मुंडे यांचा वैद्यनाथ साखर कारखान्यावर काही दिवसांपूर्वी शासनाच्या जिएसटी विभागाने नोटीस बजावून 19 कोटी रुपये थकविल्या प्रकरणी जप्तीचे आदेश दिल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ही कारवाई राजकीय सुडबुद्धीने झाल्याचे म्हटले जात आहे. या घटनेचा जालना जिल्ह्यातील पंकजा मुंडे समर्थकांनी जाहिर निषेध केला आहे. दसरा कृती समितीचे अध्यक्ष सचिन ढाकणे यांनी काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, पंकजाताई यांच्या कारखान्यावर केलेली कारवाई सुडबुद्धीनी झाली असून 19 कोटीच काय पण समाज एकवटला तर जिएसटी विभागाचे खाते बंद करू असा इशाराही ढाकणे यांनी दिला आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी मोठ्या कष्टाने वैद्यनाथ साखर कारखान्याची स्थापना




केली होती. अनेक कष्टकरी, शेतकरी व ऊसतोड मजुरांची कुटुंबं या कारखान्यावर उपजीविका करतात. म्हणून कारखान्यावर जप्तीची कारवाई म्हणजे केवळ मुंडे परिवाराचा नव्हे तर ऊसतोड कामगार आणि कष्टकरी लोकांचा अवमान आहे. राजकीय अस्तित्व संपवण्यासाठी पंकजा मुंडे यांना वारंवार अपमानित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु



यापुढे हा अपमान सहन केला जाणार नाही. भविष्यात त्यांच्या समर्थनार्थ मोठा लढा उभारणार असून समाज बांधव त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा असल्याचे ढाकणे यांनी सांगितले.

# स्वातंत्र्याच्या लढ्यात महात्मा गांधी, शास्त्रींजींचे योगदान महत्त्वाचे : कासले

आधुनिक केसरी न्यूज

**अशोक हाके**

**कुंडलवाडी :** देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रपिता महात्मा गांधीचे व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मत सहायक पोलिस निरीक्षक विश्वजीत कासले यांनी व्यक्त केले. २ ऑक्टोबर रोजी कुंडलवाडी पोलिस ठाण्यात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी व मा. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुढे बोलताना कासले यांनी दोन्ही राष्ट्र पुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकताना म्हणाले की, २ ऑक्टोबर ही भारताच्या इतिहासातील एक अशी तारीख आहे जेव्हा दोन महान नेते या जगात आले. एक राष्ट्रपिता महात्मा गांधी दुसरे म्हणजे साध्या,सौम्यतेचे प्रतीक आणि थंड निसर्ग पण देशाचे अद्वितीय धैर्य लाभलेले भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री. महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी पोरबंदर येथे झाला. दक्षिण आफ्रिकेत अपमानाचा सामना केल्यानंतर इंग्रजांपासून सुटका करून घेण्यासाठी भारतात आलेल्या गांधीजींनी चंपारण सत्याग्रहाने आपल्या आंदोलनाचा आंदोलनाचा बिगुल वाजवला. असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ, मिठाचा सत्याग्रह, भारत छोडो आंदोलन या देशातील विविध आंदोलनांच्या आधारे त्यांनी इंग्रजांना भारत सोडण्यास भाग पाडले. स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावणारे आणि पंडित नेहरूंनंतर देशाची सूत्रे हाती घेणारे लालबहादूर शास्त्री यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी झाला. जय जवान जय किसानचा नारा देणाऱ्या शास्त्रीजींच्या नेतृत्वाखाली १९६५ भारत - पाकिस्तान युद्धाच्या पाकिस्तानचा दारुण पराभव झाला असल्याची माहिती कासले यांनी दिली. यावेळी श्रीपत पाटील ढगे,महेश माकुरवार, सुदर्शन कमलाकर,शंकर चव्हाण ,पिराजी मेडेवार, नजीर शेख, संजय चापलवार, नागेंद्र कांबळे, यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.



# ब्रिलियंट स्कूल येथे स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आदर्श शिक्षण संस्थेच्या ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज खंडाळा बावडा येथे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याकडून स्वच्छता मोहीम हाती घेत परिसरातील स्वच्छता करण्यात आली.महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यप्राप्ती जे योगदान दिले. त्याचे स्मरण करून देशभक्ती आणि देशाप्रती असलेला देशाभिमान या विषयावर संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात संस्थेच्या सचिव स्नेहल जयकुमार खरात यांनी स्वातंत्र्याचा जाज्वल्य इतिहास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सखोलपणे मांडला.



संस्थेच्या सर्वच पदाधिकारी व सदस्य यांनी गांधीजींच्या आठवणी जाग्या करण्यासाठी स्वच्छता अभियान राबविले. परिसर स्वच्छता मोहीम राबविताना विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने मोहिमेत सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान देशभक्तीपर गीते आणि विचार मांडून विद्यार्थ्यांनी संपूर्ण दिवस महात्मा गांधींना अभिवादन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्या सुदर्शना जाधव यांनी परिश्रम घेतले. तसेच संस्थेच्या वतीने सदस्य प्रशांत भालेराव, उपाध्यक्ष जयकुमार खरात आणि अध्यक्ष गौतम भोसले यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केलेल्या श्रमदानाबद्दल कौतुक व्यक्त केले. प्राचार्या सुदर्शना जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मंडप, रथ रस्त्यांवरच; मंडळांवर कारवाई सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** गणेशोत्सवानंतर दोन दिवसांत मंडप, कमानी काढण्याच्या हमीवर परवानगी घेतलेल्या सार्वजनिक मंडळांचे मंडप, कमानी आणि विसर्जन मिरवणुकीतील रथ रस्त्यावरच उभे आहेत. त्यामुळे वाहनचालक, पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होत असून, त्याबाबतच्या तक्रारी नागरिकांकडून महापालिका प्रशासनाकडे करण्यास सुरुवात झाली आहे. महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागानेही मुदतीमध्ये मंडप न काढणाऱ्या २२ सार्वजनिक गणेश मंडळांवर कारवाई केली केली असून, काही मंडळांना नोटीस बजाविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. गणेशोत्सवासाठी मंडळांसाठीची नियमावली महापालिकेकडून जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार कमानीची उंची रस्त्याच्या पृष्ठभागापासून १८ फुटांपेक्षा जास्त ठेवून उत्सवानंतर मंडळांनी पुढील तीन दिवसांच्या आत स्वखर्चाने मंडप, कमानी, रनिंग मंडप, रस्त्यावरील देखावे, विटांची बांधकामे हटवून रस्त्यावरील खड्डे स्वखर्चाने हटविणे बंधनकारक करण्यात आले होते. उत्सवानंतर दोन दिवसांच्या आता मंडप काढण्याचे बंधनही मंडळांवर घालण्यात आले होते. या अटींवर महापालिकेने मंडळांना परवानगी दिली होती.

# आंदेकर टोळीकडून दोघांवर हल्ला, एक चिंताजनक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नाना पेठेत टोळीयुद्धाचा भडका उडाला. वर्चस्वाच्या वादातून आंदेकर टोळीतील हल्लेखोरांनी दोघांवर कोयत्याने हल्ला केला. या घटनेत एकजण गंभीर जखमी झाला असून, पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. निखिल आखाडे (वय २९), अनिकेत दुधभाते (वय २७, दोघे रा. आंबेगाव पठार, धनकवडी) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाना पेठेतील आंदेकर टोळी आणि सूरज ठोंबरे टोळीत वैमनस्य आहे. ठोंबरेचा साथीदार सोमनाथ गायकवाड याचे निखिल आखाडे, अनिकेत दुधभाते मित्र आहेत. सोमवारी सायंकाळी आखाडे आणि दुधभाते गणेश पेठेतील शितळादेवी मंदिर चौकातून अशोक चौकाकडे निघाले होते. त्या वेळी आंदेकर टोळीतील हल्लेखोरांनी त्यांच्यावर कोयत्याने वार केले. या घटनेत आखाडे आणि दुधभाते गंभीर जखमी झाले.



# जरांगे पाटील यांच्या सभेला जाण्यासाठी कन्नड तालुक्यातून जोरदार तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येत्या 14 तारखेला आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या सभेसाठी कन्नड तालुक्यातुन जोरदार तयारी सुरू असुन हतनूर येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिरात बैठक घेण्यात आली. या वेळी हतनूर सर्कलमध्ये सर्व गावातील मराठा बांधव उपस्थीत होते.

जरांगे पाटील यांच्या सभेसाठी जास्तीत जास्त समाज बांधवांनी यावे या साठी तालुक्यातील प्रत्येक सर्कलमध्ये बैठका सुरू झाल्या असुन आज हातनूर गावात विठ्ठल रुक्मिणी बैठक घेण्यात आली या बैठकीला हतनूर सर्कलचे सर्व गावातील मराठा बांधवांची उपस्थिती होती.



# उमरी तालुक्यात धनगर समाजाच्या वतीने रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** येथील धनगर समाजाचे नेते सुरेश बंडगर यांच्या उपोषणाला पाठिंबा व धनगर समाजाचे एसटी प्रवर्गामध्ये समावेश करावा या मागणीसाठी उमरी तालुक्यातील सकल रास्ता रोको आंदोलन धनगर समाजाच्या वतीने आंदोलन रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. गेल्या 75 वर्षापासून धनगर समाजाला आशावाद ठेवून राजकीय मंडळी समाजाची दिशाभूल करत आहेत. आजपर्यंत आरक्षण न देऊ शकलेल्या सर्व सरकारच्या जाहीर निषेध करून तातडीने महाराष्ट्रातील धनगर समाजाचा कलम 36 घटनेनुसार एसटीमध्ये आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी मंगळवारी उमरी कारेगाव वाईट पॉइंट येथे धनगर समाजातर्फे रास्ता रोको करण्यात आले. सकल धनगर समाजाच्या वतीने शहरातून भव्य मोटरसायकल रॅली करण्यात आली व वाघ्या मुरळीचे भजन करण्यात आले. मोटरसायकल रॅली उमरी शहरातील मुख्य रस्त्यावरून निघून पुण्यश्लोक आहिल्यादेवी अहिल्यादेवी होळकर सभागृहात जाहीर सभेचे रूपांतर झाले. यावेळी धनगर समाजाची ज्येष्ठ नेते शाहीर जेंटल कोंमराजी गुंठे, सकल धनगर समाजाचे तालुकाध्यक्ष देविदास मुंडफळे, तालुका उपाध्यक्ष गणपत शिगळे, पत्रकार पिराजी कराडे, मेंढपाळ मोर्चाचे तालुकाध्यक्ष संतोष गुंटे, तालुका उपाध्यक्ष विलास लोहगावे, यशवंत सेनेचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर लोहगावे, बाबुराव कमळे, हरी कमळे, कोंमराजीसंबोड, गंगाधर शिगळे माजी सरपंच तळेगाव, देविदास सबोंड, मेंढपाळ तालुका अध्यक्ष मुदखेड मारुती संबोड, व्यंकटी काकाळे, मॅकले गोविंद, मोहन कमळे, नरसिंग बहिरवाड, शिवाजी देबनवाड, मारुती सुरणे, लक्ष्मण सुरणे, बालाजी सुरणे, अशोक हुलगुंडे, मारुती कमळे, प्रल्हाद कमळे, सयाजी कोंडीबा संबोड, हूलाजी कांमाळे व सर्व उमरी तालुक्यातील धनगर समाज बांधव उपस्थित होते.





# अजिंठा लेणीला समता सैनिक दलाचे अध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकरांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणीमध्ये दि.30 रोजी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व समता सैनिक दलाचे सैनिक यांच्यासह डॉ. भीमराव आंबेडकर यांनी भेट दिली. महाराष्ट्र राज्यात व देशात ज्या ज्या ठिकाणी बौद्ध लेण्या कोरलेल्या आहे. त्या बोद्ध लेणी संवर्धन व बौद्ध संस्कृतीचा हा महान ठेवा जतन करता यावा, येणारी पिढीला मार्गदर्शक अभ्यासता यावा यासाठी अशा लेणीला प्रत्येक बौद्ध व्यक्तींनी भेटी दिल्या पाहिजेत धम्म समजुन घेतला पाहिजे लेणी मध्ये होणारे अतिक्रमण, विकृतीकरण व कर्मकांड या गोष्टी वाढीस लागु नये यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे पदभार हाती घेताच आपल्या जवळच्या लेणी मध्ये बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार प्रसिध्दी हेतूनं वर्षावास प्रवचन मालिकेचं उद्घाटन करण्यात यावं असे, आवाहन व आदेश दिले यानुसार मागील वर्षी देखील भारतीय बौद्ध महासभेच्या जामनेर तालुका शाखा तालुका अध्यक्ष वसंतदादा लोखंडे व जिल्हा उपाध्यक्ष संस्कार प्रमुख सुशीलकुमार हिवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली, तालुका पदाधिकारी व फर्दापूर येथील बौद्ध उपासक उपासिका यांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला होता याची नोंद भारतीय बौद्ध महासभेने घेतली होती. धम्मांचल येथील साकारलेल्या भव्य दिव्य अशा बुद्ध मुर्तीला डॉ. भिमराव साहेबांनी अभिवादन करून भिक्खू निवासाला विहारात भेट देऊन आजच्या भंतेजीना वंदन करुन उपस्थित कार्यकर्त्यांना भाद्रपद पौर्णिमेच्या निमित्ताने शुभेच्छा, मार्गदर्शन केले आणि पुढील धम्मपरिषदेस उपस्थित राहू असे सांगितले सर्वांचे भंतेजीचे क्षेम कुशल विचारुन मुख्य लेणी कडे प्रस्थान केले.

या ठिकाणी समता सैनिक दलाच्या वतीने डॉ. भीमराव आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली यानंतर संपूर्ण बुद्ध लेणी मध्ये जाऊन अभिवादन करून लेणी येथील कर्मचारी अनिल लाठे, यांनी सर्व लेण्याची माहिती दिली. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात लेणीचे निरीक्षण केले या वेळी भारतीय पुरातत्व विभागाचे कनिष्ठ सहाय्यक अधिकारी जितेंद्र दिवेकर, के. के शेख. फर्दापूर पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक भरत मोरे, सर्व कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. आदी उपस्थित होते.

# नगर पालिकेच्या वतीने 'एक तास स्वच्छता श्रमदान' करून महात्मा गांधींना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगर परिषदेच्या वतीने रविवार (ता.०१) रोजी येथील बस स्थानक परिसर, भाजी मंडई परिसर येथे लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नगर परिषद अधिकारी व कर्मचारी यांनी सकाळी दहा वाजता एकत्र जमून स्वच्छताचा संकल्प सोडत एक तास भर परिसर स्वच्छता केली व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना "स्वच्छतांजली" अर्पण केली. स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत यांनी प्रथम "स्वच्छता हीच सेवा"या विषयी व स्वच्छता विषयी माहिती देऊन सर्वांना दररोज एक तास स्वच्छता सेवा करण्याची प्रतिज्ञा दिली. नगराध्यक्षा सौ. शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी, उप मुख्याधिकारी राहुल साठे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सविता निकाळे, स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, रमेश त्रिभुवन, विष्णू आलूले, वाल्मिक शेटे, गणेश टिभे, अभिषेक त्रिभुवन, अशोक बागुल, निर्मला जाधव, मंजिरी खैरे, भाग्यवंत, चिमटे, अरुण कुलकर्णी, पवार तसेच ज्ञानराधा या पतसंस्थाच्या कर्मचारी वर्गानेही स्वच्छता केली.



# कन्नड शहरात भाजपाच्या वतीने रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे भारतीय जनता पार्टी शहराचे अध्यक्ष सुनील पवार यांचा वतीने देशाचे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा निमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. शहरातील भाजप कार्यालयात हिवरखेडा रोड येथे संपन्न झाले. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, कन्नड सोयगाव निवडणूक प्रमुख प्रा संजय गव्हाणे ,भाजपा तालुकाध्यक्ष किशोर पवार, शहराध्यक्ष सुनील पवार,भाजपा जिल्हासचिव काकासाहेब तायडे, भाजपा उपजिल्हाध्यक्ष सुभाष काळे, भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले, विलास इंगळे, प्रशांत अग्रवाल, गणेश बळे,गणेश चव्हाण, गणेश राठोड, स्वप्निल जागीरदार,भटक्या विमुक्त आघाडी तालुका अध्यक्ष विष्णू राठोड, संदीप उजागरे,संदीप चव्हाण,अमोल मैराळ, संदीप पाटील, दीपक घाडगे, मंगेश मावस, युवा मोर्चा शहराध्यक्ष प्रकाश शिरसे,शंकर राऊत, आकाश काळे, काकासाहेब आडे, कैलास जाधव, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अर्चना पवार,शिवाजी बोरसे सर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.




# पितृपक्षात भाजीपाल्याचे दर भिडले गगनाला

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** गणेशोत्सव संपताच पितृपक्षाला २९ सप्टेंबर पासून सुरुवात झाली. पितृपक्षात पितरांना भोजन घालण्याची परंपरा आहे. यासाठी आख्यिकेनुसार विविध प्रकारच्या भाज्यांना मागणी असते. त्यात एक मिश्र भाजी ही अगत्याने असतेच परंतु, यंदा परतीचा पाऊस आणि त्यात अतिवृष्टीने भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून विविध भाज्यांची बाजारात आवक घटली आहे. दरम्यान मागणी वाढल्याने भाजीपाल्याचे दर दुपट्टी, तिप्पटी ने वाढून गगणालाच भिडले आहेत. गणेशोत्सवाच्या पूर्वी भाजीपाल्याचे दर कमालीने पडले होते. वांगे, टोमॅटो, भेंडी आदींना १० ते २० रुपये प्रति किलोचा दर मिळत होता, परंतु, गणेशोत्सव सुरू होताच लळीत सुरू झाला आणि भाजीपाला कडाडला.



# मुद्रांक विक्रेता महासंघातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महसुल विभागाने 100 व 500 रुपयाचे स्टॅम्प पेपर आता व्यवहारातून बाद करण्याचा निर्णय घेत असून बँकेतून फॅकींग करुन स्टॅम्प विक्री करण्याचा मानस त्यासाठी मुद्रांक विक्रेता व दस्तलेखक महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आले. ह्या ठिकाणी सांगण्यात आले की इंग्रजांच्या काळापासून मुद्रांक विक्रेते हे व्यवसाय प्रामाणिकपणे करीत आहेत. कुठल्याही प्रकारची कोणाचीही तक्रार नाही. महाराष्ट्रात गाजलेल्या तेलगी घोटाळ्यात सुध्दा एकही मुद्रांक विक्रेत्याचा सहभाग नव्हता. असे या निवेदनात सांगण्यात आले. महाराष्ट्रातुन सुमारे साडेतीन हजाराच्या आसपास मुद्रांक विक्रेते आहेत, त्यावर त्यांचे संपूर्ण कुटुंब अवलंबून आहे. मुद्रांक विक्री बँकांना देऊन महाराष्ट्रातील मुद्रांक विक्रेत्यांना देशोधडीला लावण्याचे काम शासनाने करू नये. अन्यथा त्याचे परिणाम भोगावे लागतील सांगण्यात आले मंत्रीमंडळाने असा कुठलाही प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुर करु नये. अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रातील मुद्रांक विक्रेते व त्यांचे कुटुंबासहीत आझाद मैदान मुंबई येथे मोठ्या स्वरुपात आंदोलन करण्यात येईल असे निवेदनाद्वारे सांगण्यात आले आहे.

# सोबलगाव येथे एक तारीख एक तास श्रमदान मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** सोबलगाव येथे एक तारिख एक तास श्रमदान मोहीम जिल्हा परिषद शाळा व शाळा परिसर व गाव गल्ली येथे झाडु लावत स्वच्छता अभियान दि. १ राबविण्यात आला. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष तथा पाडळी सोबलगाव ग्रामपंचायत चे उपसरपंच अजिनाथ पाटील सांळुके यांच्या अध्यक्षतेखाली श्रमदान मोहीम तून स्वच्छता अभियान राबविण्यात आली. मोहिमेत ग्रामपंचायत पदाधिकारी शालेय समिती अध्यक्ष सदस्य मुख्याध्यापक शिक्षकवृंद विद्यार्थी महिला पुरुष मुले आदिने उत्साहात सहभाग नोंदविला.



# महाराष्ट्र जनसंपर्क अभियानाला लातूर लोकसभा मतदारसंघातून सुरुवात

## भा. ई. नगराळे

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन मोरे**

**कंधार :** लोहा मतदार संघ मागील दहा वर्षांपासून विकासापासून वंचित राहिला आहे, येणाऱ्या काळात या मतदारसंघात विशेष लक्ष दिले जाईल काँग्रेस हे सेक्युलरिझम पक्ष असून या पक्षात सर्व जातीचे धर्मांचे लोक असून यामध्ये सोशल इंजिनिअरिंग या पद्धतीने पक्ष काम करीत आहे. या निमित्ताने महाराष्ट्र जनसंपर्क अभियानाला लातूर लोकसभा मतदारसंघातून सुरुवात झाली आहे. असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसकमिटीचे उपाध्यक्ष भा. ई. नगराळे कंधार येथे बोलताना म्हणाले.

लातूर लोकसभे अंतर्गत मतदार संपर्क अभियाना राबवण्यात येत असून कंधार येथे २६ रोजी माजी आ. ईश्वरराव भोसीकर यांच्या निवास निवासस्थानी महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष भा. ई. नगराळे यांनी भेट देऊन पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन लातूर लोकसभा



स्वप्निल पाटील लुंगारे मागासवर्गीय सेलचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब पवार, तालुका सचिव सुरेश कल्हाळीकर, शहराअध्यक्ष हमीद भाई सुलेमान, सेवादल तालुका अध्यक्ष रमेशसिंह ठाकुर,हमीदोदीन मोलसाब, प्रफुल्ल भाऊ बडवणे, राजेंद्र कांबळे, बालाजी गित्ते, हणमंत पेठकर, मन्मथ नाईकवाडे, प्रा.चंद्रकांत सोनटक्के, शंकरराव घोडके, मोहम्मद आजमुद्दीन, अजय मोरे, स्वप्निल परोडवाड, शुभम कुरुळेकर, तारकेश तपासे, शेख आयुब, शेख हबीब यांच्यासह कॉंग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# पूरग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी भूमिपुत्रांचे उपविभागीय कार्यालय येथे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा. :** २२ जुलैला जळगाव जामोद/संग्रामपूर तालुक्यात ढगफुटी झाली त्या ढगफुटीमुळे नदी नाल्यांना पाणीच पाणी वाहू लागले महापुरासारखे विदारक वास्तव तयार झाले होते.
नदीकाठच्या व लहानसाहान नाल्यांवरच्या शेत्या पिकांसह खरडूनच नाही तर १०/१५ वर्ष निकृष्ट राहतील अशा स्वरूपाच्या झाल्या झाल्या कोणत्याही शेतकऱ्यांच्या शेतामध्ये गेले तर खड्डेच खड्डे दिसतील अनेक शेतकऱ्यांच्या शेतामधुन नद्यांचे प्रवाह पडले एवढी पिकाची व शेतीची नुकसान होऊन शेतकऱ्याला एक रुपयाची आर्थिक मदत सरकारकडून मिळालेली नाही.
तसेच या पुरामुळे दोन्ही तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले होते. अनेकांची घरदारे पडली कुटुंबचे-कुटुंब बेघर झाली काहींच्या घरी पाणी प्यायला ग्लास सुद्धा राहिला नव्हता. काहींचे कुटुंबे रस्त्यावर आली एवढा कठीण प्रसंग उद्भवला होता.
अशा या परिस्थितीमध्ये जिल्ह्यातील काही सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन थोडाफार का होईना बेघर गरजूंना जीवन आवश्यक किटचे वाटप केले, कोणी जेवण दिले, काहींनी थोडाफार आर्थिक सहारा दिला, व अनेकांनी होईल तेवढी मदत केली. परंतु सरकारने मात्र सानुग्रह अनुदान वाटत असतांना अनेक गरजुंना अनुदानापासून वंचित ठेवले. हे गरीब गरजू अजूनही सानुग्रह मदतीच्या प्रतीक्षेत आहे. अशा या महाभयंकर पुरामध्ये काही शेतकऱ्यांची गुरेढोरे, शेती उपयोगी साहित्य काहींची दुकाने वाहून गेली याची सुद्धा आजपर्यंत कोणतीच आर्थिक मदत मिळाली नाही.
आम्हा पुरग्रस्तांना आर्थिक मदत मिळावी यासाठी गरजू लोक उपविभागीय कार्यालय जळगाव जामोद,तहसील कार्यालय जळगाव जामोद, संग्रामपूर येथे कागदपत्रे घेऊन कार्यालयाकडे जात आहे. परंतु शासन मात्र आमच्या लक्ष द्यायला तयार नाही अशा भावना पूरग्रस्तांच्या आहे.
या पूरग्रस्तांच्या मागण्या रास्त असून त्यांना आर्थिक मदत द्या ही मागणी घेऊन घेऊन आज दिनांक ३ ऑक्टोबरला युवा आंदोलक अक्षय पाटील यांच्या नेतृत्वात उपविभागीय कार्यालय जळगाव जामोद येथे शेतकरी,पूरग्रस्तांच्या वतीने सरकारचे लक्ष वेधण्याकरता एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात येत आहे.



# एकतर्फी प्रेमातून युवतीची हत्या, चौघांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** हिंगणघाट येथील अंकिता प्रकरणाची धक्कादायक पुनरावृत्ती झाली आहे. सेलू तालुक्यातील दहेगाव गोसावी येथील अंकिता सतीश बाईलबोडे या तरुणीची धारधार शस्त्राने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. सोमवारी रात्रीची ही घटना आहे. हल्ला झाल्यानंतर तिला सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र अखेर तिची प्राणज्योत मालवली.



# गोंडवाना समाजातील लोकांना जोडणारे विद्यापीठ : डॉ. सतीश गोगुलवार

आधुनिक केसरी न्यूज

**विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर व्हावे : डॉ . देवराव होळी**
गोंडवाना विद्यापीठाची उत्तरोत्तर प्रगती होत आहे .केंद्र सरकार आणि राज्य सरकारने निधी या विद्यापीठाला दिला आहे, त्यामुळे त्यांचे मी आभार मानतो . आदिवासी नक्षलग्रस्त भागातील गोंडवाना विद्यापीठात महामहिम राष्ट्रपती आल्या आणि विद्यापीठाच्या विकासाची हमी त्यांनी दिली . डॉ सतीश गोगुलवर यांना जीवन गौरव पुरस्कार मिळाला याबाबत त्यांचे अभिनंदन करतो .या पुरस्कारामूळे विद्यार्थ्यांच्या मनात समाजसेवेची भावना जागृत होईल .मेरा देश मेरी मिट्टी या उपक्रमाच्या माध्यमातून देशात राष्ट्रप्रेम आणि देशप्रेम निर्माण होत आहे, राष्ट्रभाव निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब करत आहेत आझादी के अमृत महोत्सवाच्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयात, गावात, विभागात 75 वृक्ष लावायचे आहे, हे वृक्ष फोटो पुरती न ठेवता ते 75 वर्षे कसे टिकेल याची काळजी घेतली पाहिजे हे अभियान प्रत्येक गावापर्यंत पोहचविले पाहिजे . विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर विद्यार्थी होणे गरजेचे आहे .

**गडचिरोली :** लोकांचे जंगलांचे अधिकार संपायला आले होते. खऱ्या अर्थाने आदिवासी आणि वनवासी यांचे अधिकार नष्ट व्हायला लागले होते. मेंढालेखा गावाला पहिले सामूहिक अधिकार प्राप्त झाले. आता बऱ्याच गावांना सामूहिक अधिकार मिळाले. ग्रामसभांना समृद्ध करण्यासाठी एकल प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हाधिकारी संजय मीणा यांच्या संकल्पनेने सुरु झाला. कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांच्या सहकार्याने गोंडवाना विद्यापीठ नॉलेज पार्टनर म्हणून काम करत आहे. स्थानिक लोकांचा एकल प्रशिक्षणचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी विद्यापीठाने संधी दिली.यात १०० गावातील तरुण-तरुणी सहयोगी म्हणून काम करू लागले. सरळ विद्यापीठ गावातील लोकांशी जोडले गेले. गोंडवाना विद्यापीठ हे समाजातील लोकांना जोडणारे विद्यापीठ आहे. असे प्रतिपादन जीवन साधना गौरव पुरस्कार प्राप्त आम्ही आमच्या आरोग्यासाठी, संयोजक डॉ. सतीश गोगुलवार यांनी जीवन साधना गौरव पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर केले. यावेळी पत्नी शुभदा देशमुख यांच्यासह सत्कार करण्यात आला. २ ऑक्टोबर २०२३ रोजी गोंडवाना विद्यापीठाने १२ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करीत १३व्या वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने विविध पुरस्काराचे वितरण, परीक्षा भवन व मॉडेल कॉलेज भवनाचे लोकार्पण तसेच विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आज महाराजा सेलिब्रेशन हॉल ऍन्ड लॉन, माडीया तुकुम, धानोरा रोड, सिटी हार्ट हॉटेल जवळ, येथे वर्धापन दिन सोहळा संपन्न झाला.
या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून, आमदार डॉ. देवराव होळी, जिल्हाधिकारी, गडचिरोली संजय मीणा , कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु, डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान डॉ. अनिल चिताडे, अधिष्ठाता मानव विज्ञान विद्या शाखा डॉ. चंद्रमौली, वित्त व लेखा अधिकारी डॉ. भास्कर पठारे, व्यस्थापन परिषदेचे सदस्य श्री प्रशांत मोहिते,डॉ. संजय गोरे, श्री.स्वप्नील दोंतूलवार डॉ. प्राचार्य लेमराज लडके, डॉ.विवेक गोर्लवार,श्री.गुरुदास कामडी, श्री. प्रशांत दोंतुलवार,डॉ. नंदाजी सातपुते, डॉ. रंजना लाड आदी उपस्थित होते.
मेरी माटी मेरा देश" या उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी संजय मीणा यांना रासेयो संचालक डॉ. श्याम खंडारे, यांच्या हस्ते अमृत कलश सुपूर्द करण्यात आला.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर